**विकणे आहे**
भेंडा खुर्द, ता. नेवासा
येथील मुख्य गल्लीतील
राहण्यास योग्य प्लॉट
योग्य किंमत आल्यास
तातडीने विकणे आहे.
संपर्क : +91 9850386599

दैनिक **राष्ट्र सह्याद्री**
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिद्ध
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.00 I अंक २०१ I मंगळवार ५ मे २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 I www.rashtrasahyadri.com




# पश्चिम बंगाल, आसाम, पाँडेचेरीत भाजपची मुसंडी

## केरळमध्ये काँग्रेसची आघाडी तर तामिळनाडूमध्ये विजय थलपति याच्या 'टीव्हीके'ने मारली बाजी



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली : गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल सोमवारी जाहीर झाला. पश्चिम बंगाल, आसाम, पाँडेचेरी, तामिळनाडू आणि केरळ या पाचही राज्यांमध्ये सोमवारी सकाळी आठ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. यामध्ये पश्चिम बंगालमध्ये भाजपला घवघवीत यश मिळाले.**

ममता बॅनर्जी यांची पंधरा वर्षांची सत्ता भाजपने उलथवून टाकली. तर आसाममध्येही भाजपने पुन्हा एकदा सत्ता राखण्यात यश मिळवले. तर केरळमध्ये डाव्यांचा शेवटचा गड पडला असून याठिकाणी काँग्रेसची सत्ता आली. तामिळनाडूमध्ये अभिनेता विजय थलपति यांच्या टीव्हीके पक्षाने मुसंडी मारत द्रमुक आणि अण्णाद्रमुकला मागे टाकले. पाँडेचेरीमध्येही भाजपने यश मिळवले आहे.

पाच राज्यांच्या निवडणुकीत मिळालेल्या या यशामुळे भाजपची देशभरातील ताकद आणखी वाढली आहे. त्यामुळे आगामी काळात भाजप आणखी आक्रमक राजकारणाचे धोरण अवलंबू शकते. या निकालातून आता विरोधक काय धडा घेणार आणि यापुढे कशाप्रकारची रणनीती आखणार, हे पाहावे लागेल.

### पश्चिम बंगालमधील यश हे अतिशय दैदिप्यमान : एकनाथ शिंदे



पश्चिम बंगालमध्ये भाजपला मिळालेलं यश हे अतिशय दैदिप्यमान असल्याचे मत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनात शिंदे यांनी व्यक्त केले. तिथे खालच्या पातळीवर जात टीका केली गेली. मात्र मोदीजींच्या पाठीमागे जनता उभी राहिल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. मोदीजींवर आरोप केले मात्र आता ते विकासाच्या माध्यमातून उत्तर देतील. बंगाल विकासपासून वंचित राहिला आहे आता तो विकास होईल असे एकनाथ शिंदे म्हणाले. एसआयआरच्या माध्यमातून घुसखोर कमी झाले आहेत. एक प्रकारची आतंकवादी भूमिका आपण पाहिली. घटना घातक होत्या, कायद्याचे राज्य आणण्याचे काम केल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

### दिवा विझताना मोठा होतो : संजय राऊत



पश्चिम बंगालमध्ये भाजपचा विजय झाला. दिवा विझताना मोठा होतो, आता त्यांचं कार्य संपलेले आहे. बंगालमध्ये ३० ते ३५ मतदान केंद्रावर मतमोजणी थांबली आहे. अनेक मतदान केंद्रावर भाजपचे कार्यकर्ते लूट करत आहेत. सीआरपीएफची मदत भाजपच्या कार्यकर्त्यांना आहे. भारतीय जनता पक्ष पश्चिम बंगालमध्ये सत्ता घेताना दिसत आहे. मोदी आणि शहा यांचं स्वप्न अखेरचं पूर्ण झालं आहे. त्यामुळे मोदी– शहा यांचं राष्ट्रीय स्तरावरच कार्य संपलेले दिसत आहे. एसआयआर, धर्मांतर या सगळ्या विषयावर त्यांचा पराभव रोखण्यात आला. भाजपला सरळ मार्गाने हा विजय मिळालेला नाही, असे शिवसेना खासदार संजय राऊत यांनी म्हटले.

### संपूर्ण भारत जिंकला आहे : मुख्यमंत्री फडणवीस



ममतादीदी तुम्ही कितीही अत्याचार केला, तरीही भाजपच्या कार्यकर्त्यांना तुम्ही थांबवू शकणार नाही, असा हा आजचा विजय आहे. आज केवळ भाजप जिंकली नाही, तर संपूर्ण भारत जिंकला आहे. आसामप्रमाणे आता बंगालही भारताच्या वाटचालीत निर्णयाक भूमिका बजावेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### पश्चिम बंगाल

| | |
|---|---|
| भाजप – | १९५ |
| तृणमूल काँग्रेस– | ९२ |
| काँग्रेस – | ० |
| डावे पक्ष– | ०२ |
| इतर–२ | |
| एकूण जागा– | २९३ |

### तामिळनाडू

| | |
|---|---|
| द्रमुक – | ६८ |
| अण्णाद्रमुक – | ५८ |
| टीव्हीके – | १०६ |
| इतर–०० | |
| एकूण जागा– | २३४ |

### केरळ

| | |
|---|---|
| काँग्रेस – | १०४ |
| डावी आघाडी – | ३४ |
| इतर– | २ |
| एकूण जागा– | १४० |

### आसाम

| | |
|---|---|
| भाजप – | १०० |
| काँग्रेस – | २० |
| इतर – | ६ |
| एकूण जागा – | १२६ |

### पाँडेचेरी

| | |
|---|---|
| भाजप – | २२ |
| काँग्रेस – | ६ |
| इतर – | १ |



'सहजयोग'
भाग ४३

## ब्रम्हशक्ती कुंडलिनी

आपण जे काही जीवंत कार्य संसारात बघतो, जस एका लहान बी तून एवढं मोठं झाड निघाले. त्याला फूलं आली, त्या फूलांना फळे लागली. एवढी मोठी जीवंत क्रिया – आपण विचारसुद्धा करत नाही. असं वाटत की आपला अधिकारच आहे की आत आपण जमिनीत बी पेरलं , बी मधून रोपं आली पाहिजेत, रोपाला फूल लागले पाहिजेत, त्याचे धान्य झाले पाहिजे आणि आपल्याला ते धान्य मिळाले पाहिजे. आणि हे सर्व करणारं कोण आहे? याची कोण शक्ती आहे? हे मात्र सायन्स सांगू शकत नाही. ते फक्त असं सांगू शकतात की असं बी लावलं की त्याच्यातून रोप निघणार. त्यामुळे माणसाला फक्त जे दिसतं समोर तेवढंच माहिती आहे. त्याच्या पलिकडचे माहीत नाही आणि सायन्सने ते दिसणार नाही. कारण सायन्सला आपली सीमा आहे. आता असं म्हणतात की असीम आहे,सर्वत्र पसरलेली अशी परमेश्वरी शक्ती आहे आणि तिला ब्रह्मशक्ती(कुंडलिनी) म्हणतात.आदि शंकराचार्यांनी ब्रह्म तेवढे सत्य आहे बाकी मिथ्या आहे असे सांगितलेले आहे. ते आता सायन्सवर कसं पटवून सांगायचे हा प्रश्न आहे. मी सुद्धा तुमच्यासारखी म्हणून सायन्स शिकले, त्याच्यानंतर मेडीकल शिकले. हे ब्रह्मतत्त्व चारीकडे आहे. या ब्रह्मतत्त्वानेच कार्य होत असतात. तुमच्या शेतात तुम्ही जे काही लावता, उस लावता, त्याची लागवड करता आणि उस पुढे मोठे होऊन आणि जे काही जीवंत कार्य घटीत होतं ते सबंध या ब्रह्मशक्तीने होते आणि ही सर्वव्यापी ब्रह्मशक्ती आहे.

– ०१ फेब्रुवारी १९८२ राहुरी कृषी विद्यापीठ अधिक माहितीसाठी

www.sahajayogamumbai.org
8871519191
सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..

### पंढरपूर विकासाचा ४००० कोटींचा कॉरिडॉर मंजूर

सोलापूर: पंढरपूर देवस्थान विकास आराखडा आणि कॉरिडॉरसाठी साधारण ४००० कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून या आराखड्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील शिखर समितीने मंजुरी दिली. पंढरपूरला पुढील ५० वर्षात येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेऊन पंढरपूरसाठी मंदिर परिसरात कॉरिडॉर आणि शहरात विकास आराखडा तयार करण्यात आलेला आहे. जवळपास ४००० कोटींचा हा आराखडा असून याला आता मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाच्या शिखर समितीने मंजुरी दिल्याने पंढरपुरात लवकरच या कामाला सुरुवात होणार आहे. पंढरपूर कॉरिडॉर आणि विकास आराखड्यासंदर्भात झालेल्या मुंबईत मंत्रिमंडळ शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री जयकुमार गोरे, वनमंत्री गणेश नाईक, आमदार समाधान आवताडे यांच्यासह महसूल आणि जलसंपदा विभागाचे सचिव, जिल्हाधिकारी व इतर अधिकारी उपस्थित या बैठकीला उपस्थित होते.

# अक्षय कर्डिले १,१२,५८७ मतांनी विजयी!

## माझा विजय वडिलांना समर्पित -आ. अक्षय कर्डिले

### राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवारांसह सर्वच उमेदवारांचे डिपॉझिट जप्त !!

राजेंद्र परदेशी I राष्ट्र सह्याद्री

राहुरी नगर पाथर्डी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे निधन झाल्यामुळे राहुरी नगर पाथर्डी विधानसभा मतदार संघाची आमदारकीची जागा रिक्त झाल्यामुळे राहुरी विधानसभा पोट निवडणूक जाहीर झाली यावेळी महायुती प्रणित भाजपाचे उमेदवार म्हणून शिवाजीराव कर्डिले यांचे सुपुत्र अक्षय कर्डिले यांना पक्षाकडून संधी देण्यात आली.

यावेळी निवडणुकीच्या रणांगणात सात उमेदवार निवडणुक लढविण्यासाठी उत्सुक होते त्यामध्ये बलाढ्य विरोधक म्हणून असलेले माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी महाराष्ट्राची संस्कृतीला अनुसरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार सुजय विखे पाटील, यांच्या विनंतीला मान देऊन निवडणुकी तुन माघार घेतली होती. त्यामुळे या निवडणुकीतून प्राजक्त तनपुरे यांनी माघार घेतल्यामुळे निवडणुकीतील स्पर्धा व रंगत कमी झालेली होती.

२३ एप्रिल रोजी मतदान होऊन काल चार मे रोजी मतमोजणी झाली. सकाळी आठ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली त्यावेळी टपाली मतदानातच अक्षय कर्डिले यांनी आघाडी घेतली होती. मतमोजणीच्या **(पान ४ वर)**




## बंगालमध्ये नवा अध्याय: 'बदला' नाही, 'बदलाव' : मोदी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**नवी दिल्ली :** देशभरातील विविध राज्यांतील विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर, भारतीय जनता पक्षाच्या मुख्यालयातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना संबोधित केले. यावेळी त्यांनी पश्चिम बंगालमधील ऐतिहासिक विजयाचा जल्लोष करतानाच, महाराष्ट्रातील बारामती मतदारसंघातील उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या विक्रमी विजयाचेही विशेष कौतुक केले. भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आज पुन्हा कमाल केली असून, देशभर कमळ फुलले आहे, असे म्हणत त्यांनी कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.

पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्राचा विशेष उल्लेख केला. बारामती पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी नोंदवलेल्या विजयाचे स्वागत करत मोदी म्हणाले, एनडीएच्या नेत्या आणि महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मोठा विजय प्राप्त केला आहे. त्यांच्यावर विश्वास दाखवून त्यांना भरभरून मतदान करणाऱ्या राज्यातील सर्व जनतेचे मी आभार मानतो. लोकशाहीतील जय–पराजय **(पान ४ वर)**

## बारामतीचा नवा इतिहास...

# सुनेत्रा पवारांची विक्रमी 'एन्ट्री'!

### अजितदादांचा विक्रम मोडीत देशातील सर्वाधिक मताधिक्याचा बहुमान

सुरज देवकाते/ राष्ट्र सह्याद्री



**बारामती :** महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात नेहमीच चर्चेत राहणाऱ्या आणि पवार कुटुंबाचा अभेद्य बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बारामती मतदारसंघात आज एक नवा इतिहास रचला गेला आहे.

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा निकाल आज जाहीर झाला असून, महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी तब्बल २,१८,९३० मतांच्या प्रचंड फरकाने दणदणीत विजय संपादन केला आहे. हा विजय केवळ संख्यात्मक नसून, तो बारामतीकरांनी पवार कुटुंबावर टाकलेल्या अखंड विश्वासाची आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रति असलेल्या निष्ठेची एक मोठी पावती मानली जात आहे.

राज्याच्या निवडणूक इतिहासात आजचा निकाल एका सुवर्णक्षरांनी लिहिला गेला आहे. यापूर्वी अजित पवार यांनी याच मतदारसंघातून १ लाख ६५ हजार २६५ मताधिक्याचा विक्रम प्रस्थापित केला होता. मात्र, सुनेत्रा पवार यांनी आजच्या निकालात हा आकडा खूप मागे टाकला आहे. ताज्या आकडेवारीनुसार, सुनेत्रा पवार यांना २,१८,९३० मते मिळाली आहेत. पोटनिवडणुकीच्या इतिहासात इतक्या मोठ्या मताधिक्याने निवडून येणाऱ्या त्या पहिल्या महिला उमेदवार ठरल्या आहेत, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. या विजयाने केवळ राज्यांतर्गत नव्हे, तर राष्ट्रीय स्तरावरील सर्वाधिक मताधिक्य मिळवणाऱ्या आमदारांच्या यादीतही त्यांनी आपले स्थान पक्के केले आहे. याआधी उत्तर प्रदेशमधील सुनील कुमार शर्मा (२ लाख १४ हजार ८३४)**(पान ४ वर)**

**देशातील टॉप ३ मताधिक्य घेणारे आमदार**
१. सुनेत्रा पवार (बारामती) – २,१८,९३० (२०२६)
२. सुनील कुमार शर्मा (साहिबाबाद)–२,१४,८३४ (२०२२)
३. पंकज सिंह (नोएडा) – १,८१,५१३ (२०२२)

# कॅप्टन खरातला शिर्डी पोलिसांचा पाहुणचार

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या प्रकरणात शिर्डी पोलिसांनी अखेर कॅप्टन खरात याला अटक केली असून त्याला पोलीस कोठडीत ठेवण्यात आले आहे. जमीन बळकावणे व मनी लॉन्ड्रिंग प्रकरणातील तपासासाठी ही कारवाई करण्यात आली.

**जमीन बळकावणे व मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात अटक**

शिर्डी पोलीस ठाण्यात कॅप्टन खरात याच्याविरुद्ध दोन गुन्हे दाखल आहेत. यातील पहिला गुन्हा रावसाहेब गोंडकर यांच्या जमीन बळकावण्याच्या प्रकरणाशी संबंधित आहे. या गुन्ह्यात कल्पना खरात, अरविंद बावके, किरण सोनवणे आदींचा समावेश आरोपी म्हणून करण्यात आला आहे. त्यापैकी काही आरोपी सध्या पोलिस कोठडीत आहेत. मुख्य आरोपी असलेल्या कॅप्टन खरातच्या अटकेमुळे या प्रकरणातील अनेक बाबी उघड होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. रावसाहेब गोंडकर यांची पाच एकर जमीन बळकावल्याचा आरोप असून, समता संस्थेच्या शंभर खात्यांमधील कथित आर्थिक गैरव्यवहाराबाबतही तपास होणार आहे.

नाशिक येथील गुन्ह्यांच्या तपासानंतर शिर्डी पोलिसांनी गोपनीयरीत्या कॅप्टन खरात याला ताब्यात घेतले. सायंकाळी त्याला पोलीस ठाण्यात आणून अटकेची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, **(पान ४ वर)**

# अहिल्यानगरमध्ये भाजपा कार्यकर्त्यांचा जल्लोष अन् हाणामारीही!

किरण बोरूडे I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पश्चिम बंगाल, पांडेचेरी, केरळ, आसाम याबरोबरच बारामती आणि नगर राहुरी मतदारसंघात झालेल्या निवडणुकांचा निकाल आज जाहीर झाला. या निवडणुकीत भाजपाने घवघवीत यश मिळविले. याचा आनंद उत्सव अहिल्यानगर भाजपातर्फे शहरातील भिंगारवाला चौकात साजरा करण्यात आला. यावेळी भारत माता की जय, जय श्रीराम अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी करून कार्यकर्त्यांनी पेढे वाटून आनंद साजरा केला. दरम्यान यावेळी लक्ष्मी कारंजा येथील भाजपा कार्यालयासमोर काही भाजप पदाधिकाऱ्यांनी फटाक्याची आतिषबाजी करून जल्लोष केला. याचवेळी भाजपा युवा मोर्चाचे पदाधिकाऱ्यांमध्ये चेष्टा मस्करीतून वादावादी झाली. या वादावादीचे पर्यावसन थेट हाणामारी पर्यंत गेले. यावेळी युवा पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यात चांगलीच गुद्दा गुद्दी होऊन कपडे फाडल्याने या आनंद उत्सवाला गालबोट लागले. या प्रकाराने परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. मात्र भाजपाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून हे भांडण सोडविल्याने**(पान ४ वर)**

## संपादकीय

# राजकारण्यांना गर्भित इशारा आणि बदलाचे संकेत

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर होताच देशभरातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. या निकालांनी केवळ सत्तांतराची नांदी दिली नाही, तर मतदारांच्या बदलत्या मानसिकतेचे आणि अपेक्षांचे स्पष्ट संकेतही दिले आहेत. भारतीय जनता पार्टी ने पश्चिम बंगाल, आसाम आणि पाँडेचेरीमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत आपला प्रभाव अधिक दृढ केला आहे; तर केरळमध्ये डाव्यांचा गड कोसळून काँग्रेस सत्तेच्या केंद्रस्थानी पोहोचली आहे. तामिळनाडूमध्ये नव्या राजकीय शक्तीचा उदय हा पारंपरिक पक्षांसाठी धोक्याची घंटा ठरला आहे.

पश्चिम बंगालमधील निकाल विशेषत्वाने लक्षवेधी ठरतात. गेल्या दीड दशकांपासून सत्तेवर असलेल्या तृणमूल काँग्रेस ला मोठा धक्का बसला आहे आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपाने केवळ संघटनात्मक बळावर नव्हे, तर विविध सामाजिक घटकांना एकत्र आणत प्रभावी रणनीती राबवली. महिला मतदार, तरुण वर्ग आणि सरकारी कर्मचाऱ्यांचा कल भाजपाकडे झुकल्याचे चित्र दिसते.

या निवडणुकांमध्ये एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'मतदारांचे प्राधान्यक्रम बदलत आहेत' हा आहे. पारंपरिक जात, धर्म किंवा प्रादेशिक मुद्द्यांऐवजी आता विकास, रोजगार, सुरक्षा आणि सुसंवाद यांना अधिक महत्त्व दिले जात आहे. बंगालमध्ये महिला मतदारांनी सुरक्षिततेच्या मुद्द्यावर भूमिका घेतली; तर तरुण मतदारांनी विकास आणि रोजगाराच्या आश्वासनांकडे आकर्षित होऊन मतदान केले.

सत्ताविरोधी लाट हा देखील या निकालांचा महत्त्वाचा घटक ठरला. दीर्घकाळ सत्तेत असलेल्या सरकारांविरुद्ध नैसर्गिक असंतोष निर्माण होतो, आणि तोच या निवडणुकांमध्ये दिसून आला. बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसविरोधात, तर तामिळनाडूमध्ये पारंपरिक पक्षांविरोधात मतदारांनी स्पष्ट संदेश दिला आहे. यावरून एक गोष्ट निश्चित होतेमतदार आता 'पर्याय' शोधत आहेत आणि कोणत्याही पक्षाला कायमस्वरूपी मते देण्याच्या मानसिकतेत नाहीत.

तामिळनाडूमधील परिस्थिती तर अधिक रोचक आहे. एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील डीएमके आणि अण्णा डीएमके या दोन्ही पारंपरिक पक्षांना नव्या राजकीय शक्तीने आव्हान दिले आहे. अभिनेता विजय यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने निर्माण केलेले 'राजकीय वादळ' हे जनतेतील बदलत्या अपेक्षांचे द्योतक आहे. लोक आता नव्या चेहऱ्यांना संधी देण्यास तयार आहेत, हे यावरून स्पष्ट होते.

केरळमध्ये डाव्या आघाडीचा पराभव आणि काँग्रेसचा विजय हा देखील तितकाच महत्त्वाचा आहे. सीपीएम च्या दीर्घकालीन सत्तेला मतदारांनी नाकारत पर्याय निवडला. हा निर्णय केवळ राजकीय नसून, प्रशासनिक कामगिरीचे मूल्यमापनही आहे.

या सर्व निकालांमधून एक गोष्ट प्रकर्षाने पुढे येतेमतदार आता अधिक जागरूक, माहितीपूर्ण आणि अपेक्षाभिमुख झाला आहे. सोशल मीडिया, डिजिटल माध्यमे आणि माहितीचा सहज उपलब्ध होणारा प्रवाह यामुळे मतदारांचा दृष्टिकोन व्यापक झाला आहे. त्यामुळेच केवळ भावनिक मुद्द्यांवर मत मिळवणे कठीण झाले आहे.

मतदार याद्यांचे शुद्धीकरण, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि प्रशासनिक सुधारणा यांचाही निकालांवर परिणाम झाला आहे. बोगस मतदारांना आळा बसल्याने मतदान अधिक निष्पक्ष झाले, आणि याचा थेट फायदा संघटित पक्षांना झाला.

महाराष्ट्रातील पोटनिवडणुकांमध्येही अशाच प्रकारचे संकेत दिसून आले आहेत. बारामती आणि राहुरीसारख्या मतदारसंघांमध्ये झालेल्या बदलांनी स्थानिक पातळीवरही मतदारांचा मूड बदलत असल्याचे दाखवून दिले आहे. स्थानिक प्रश्न, विकासकामे आणि नेतृत्वाची विश्वासार्हता यावर मतदार आता अधिक भर देत आहेत.

या पार्श्वभूमीवर सत्ताधाऱ्यांसाठी हा स्पष्ट इशारा आहेजनतेचा विश्वास टिकवायचा असेल तर केवळ घोषणांवर नाही, तर प्रत्यक्ष कामगिरीवर भर द्यावा लागेल. विरोधकांसाठीही ही संधी आहेनव्या विचारसरणीने आणि प्रभावी नेतृत्वाने जनतेसमोर जाण्याची. शेवटी, या निवडणुकांचे सार एकचलोकशाहीत अंतिम सत्ता मतदाराकडेच असते. तोच राजा, तोच निर्णायक. आणि तोच आज सांगतोयकाम करा, अन्यथा बाजूला व्हा!

# नेवासा येथे पंधरा दिवसीय नि:शुल्क वारकरी बालसंस्कार शिबिर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** महावैष्णव श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांची कर्मभूमी व ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे रचनस्थान असलेल्या तीर्थक्षेत्र नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने गुरुवार दि.७ मे पासून पंधरा दिवसीय नि:शुल्क वारकरी बालसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख मार्गदर्शक व विश्वस्त हभप महंत देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांनी दिली.

सर्व संत महंत यांच्या कृपाशिर्वादाने संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानच्या वतीने वारकरी बालसंस्कार शिबिर हे गुरुवार दि.०७ मे २०२६ ते गुरुवार दि.२१ मे २०२६ या पंधरा दिवसाच्या कालावधीत चालणार आहे.वय वर्षे १० ते १६ वयोगटातील मुलांसाठी हे शिबिर असून बाल मनावर चांगले संस्कार व्हावेत आजचा बालक उद्याचा यशस्वी सुसंस्कृत पालक बनावा हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन पंधरा दिवशीय बालसंस्कार शिबीर घेण्याचे आयोजन संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानच्या वतीने करण्यात आले असल्याचे महंत देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांनी सांगितले.

वारकरी बालसंस्कार शिबिरामध्ये मुलांना काकडा भजन ,विष्णूसहस्रनाम,योग,प्राणायम,ज्ञानेश्वरी पाठांतर हरिपाठ,अभंग,थोर संतांची चरित्र,संस्कृत श्लोक,संस्कार प्रवचन शिकवण्यात येणार आहे. यासाठी प.पू. भगवान महाराज जंगले (शास्त्री), गायनाचार्य ज्ञानदेव माऊली शिंदे, रामायणाचार्य ज्ञानेश्वर माऊली नंदकिशोर महाराज खरात, गहिनीनाथ महाराज आढाव, कृष्णा महाराज हारदे, आदिनाथ महाराज भोगे, सचिन महाराज पवार, राम महाराज चोपडे, सुगम महाराज शिंदे, ओंकार महाराज काशिद, गणेश महाराज गायकवाड, सागर महाराज टेमक, राम महाराज खरवंडीकर, नवनाथ महाराज आगळे, योगेश महाराज होन, रामेश्वर महाराज कंठाळे, गणेश महाराज आरगडे, भास्कर महाराज मुळक, अविनाश महाराज लोखंडे, भगवान महाराज डिके, श्रीहरी महाराज वाकचौरे हे शिक्षकाची भूमिका बजावून बाल वारकऱ्यांना प्रशिक्षण देणार आहे यासाठी संस्थेचे आजी-माजी विद्यार्थी ही सहभागी होऊन मार्गदर्शन करणार आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे विश्वस्त व मार्गदर्शक वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या नियोजनात व मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या शिबिरात श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे अध्यक्ष व विश्वस्त मंडळाच्या वतीने योग्य नियोजन करण्यात आले असून सदर




शिबिरात १० ते १६ या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश देण्यात येणार आहे, बाहेरगावच्या मुलांची राहण्याची मोफत सोय करण्यात आली असून त्यांनी अंथरुण-पांघरुन तसेच ताट-तांब्या बरोबर आणायचे आहे.सर्व मुलांना पांढरा गणवेश बंधनकारक रहाणार आहे. शिबीरामध्ये येतांना जर विद्यार्थ्यांना पखवाज, हार्मोनियम हे वाद्य शिकायचे असल्यास ज्याचे त्याने ते वाद्य बरोबर आणणे आवश्यक असल्याचे शिबिर संयोजक वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांनी सांगितले.

उन्हाळयाच्या सुट्टीच्या निमित्ताने संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने आयोजित निशुल्क वारकरी बाल संस्कार शिबिरामध्ये पालकांनी आपल्या मुलांना सहभागी करावे त्यासाठी त्यांनी देवस्थानशी संपर्क साधून नावनोंदणी करावी असे आवाहन संस्थेचे मार्गदर्शक विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री, विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग अभंग व सर्व विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## शेतकरी बंधूंनो आपल्या शेतातील गव्हाचा काड जाळू नका : डॉ अशोक ढगे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** गव्हाच्या काडाचे उत्तम सेंद्रिय खत तयार होत असल्याने शेतकरी बंधूंनी आपल्या शेतात असलेले गव्हाचे काड जाळू नका असे आवाहन कृषी शास्त्रज्ञ डॉ.अशोक ढगे यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

रब्बी हंगामात गव्हाचे क्षेत्र पाण्याच्या उपलब्धतेमुळे मोठ्या प्रमाणात होत असते, आता गव्हाची काढणी तथा सोंगणी पूर्ण झालेली आहे. गव्हाची काढणी बहुतांशी शेतकऱ्यांनी हार्वेस्टरच्या सहाय्याने केली आहे,त्यामुळे शेतामध्ये मोठ्या प्रमाणात काड शिल्लक राहतो. या गव्हाच्या काड म्हणजे सेंद्रिय पदार्थ, सेंद्रिय पदार्थ जमिनीचा आत्मा आहे.

हा गव्हाचा काड कुजल्यानंतर त्याची जमिनीला अनेक फायदे होतात विशेषतः जिवाणूंची संख्या वाढते जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते तसेच जमिनीमध्ये हवा खेळती राहते,आज जमिनी सेंद्रिय पदार्थाच्या भुकेलेल्या आहेत कारण माती तपासणी मध्ये असे आढळून आले आहे की जमिनीमध्ये सेंद्रिय कर्ब फार कमी होत चालला आहे. त्याचा परिणाम जमिनीच्या आरोग्यावर वस्तूवर होतो.

जमिनीमध्ये जास्तीत जास्त सेंद्रिय पदार्थ कुजविणे आवश्यक आहे हा गव्हाचा काड कमी खर्चात सहज उपलब्ध होतो. तो सहज कुजविण्यासाठी कल्चर वापरावे व त्याबरोबर शक्य असल्यास एकही अर्धी युरिया पावसाळ्याच्या सुरुवातीला जमिनीला दिल्यास गव्हाच्या काडाचे उत्तम सेंद्रिय खत तयार होते, तरी शेतकरी बंधूंनी गव्हाचा काड जाळू नये असे आवाहन डॉ. अशोक ढगे यांनी केले आहे.



# परिवर्तन पॅनलचा दणदणीत विजय; २१ पैकी २० उमेदवार विजयी

## सभासदांच्या भरघोस मतदानामुळे पुरंदर तालुक्यात बदलाची नांदी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** पुरंदर तालुक्यात जिल्हा परिषद सेवकांची पतसंस्था मर्यादितच्या २०२६ च्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलने एकतर्फी विजय मिळवत २१ पैकी तब्बल २० जागांवर यश संपादन केले आहे. सभासदांनी मोठ्या प्रमाणावर मतदान करून परिवर्तनाच्या बाजूने कौल दिल्याचे स्पष्ट झाले आहे. या निकालामुळे पतसंस्थेत नवे नेतृत्व आणि धोरणात्मक बदलांची अपेक्षा निर्माण झाली आहे.

या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचे प्रमुख उमेदवार श्री. विजय भिमराव बेडेकर आणि श्री. मयूर जयराम काजरेकर यांनी प्रचंड मताधिक्याने विजय मिळवला. दोन्ही उमेदवार हे पुरंदर पंचायत समितीत कार्यरत असून कास्ट्राईब संघटनेत सक्रिय भूमिका बजावत आहेत. त्यांच्या विजयामुळे संघटनात्मक बळ अधिक दृढ झाल्याचे मानले जात आहे.



निवडणुकीत सभासदांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. मतदानाचा टक्का लक्षणीय वाढला असून, यामुळे परिवर्तन पॅनलला स्पष्ट बहुमत मिळाले. मागील काही काळात पतसंस्थेच्या कामकाजाबाबत असलेल्या नाराजीमुळे सदस्यांनी बदलाचा निर्णय घेतल्याचे दिसून येते. पारदर्शकता, वेळेवर कर्ज वितरण आणि सदस्यांच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याचे आश्वासन देत परिवर्तन पॅनलने प्रचार केला होता.

नवीन नेतृत्वाने पुढील काळात पतसंस्थेचे कामकाज अधिक सुटसुटीत आणि विश्वासार्ह करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. सदस्यांना न्याय मिळावा, कर्ज प्रक्रिया जलद व्हावी आणि आर्थिक व्यवहार पारदर्शक पद्धतीने व्हावेत यासाठी

**सभासदांनी आमच्यावर दाखवलेला विश्वास आम्ही सार्थ ठरवू. पतसंस्थेचा कारभार पूर्णपणे पारदर्शक ठेवत प्रत्येक सदस्याला वेळेत आणि योग्य सेवा देणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट असेल, असे मत विजयी उमेदवारांनी व्यक्त केले.**

==============

विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच डिजिटल पद्धतींचा वापर वाढवून सेवांमध्ये सुधारणा करण्याचाही विचार पुढे आला आहे.

# श्री क्षेत्र 'महाराजस्व समाधान शिबिराला' नागरिकांचा प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या ''छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान'' अंतर्गत थेऊरफाटा- थेऊर रोडवरील आशिर्वाद बॅंक्वेट हॉल येथे आयोजित शिबारास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यामध्ये १ हजार ७०६ नागरिकांनी लाभ घेतला आहे.अपर तहसीलदार तृप्ती कोलते-पाटील मार्गदर्शनाखाली व विविध विभाग प्रमुखांच्या उपस्थितीत शिबिराचे नियोजन करण्यात आले होते. हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे यांच्या पुढाकाराने आयोजन करण्यात आले होते.यावेळी कार्यक्रमास पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे अप्पर जिल्हाधिकारी सतीश राऊत, लोणी काळभोर अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते, अतिरिक्त गटविकास अधिकारी शिवाजी नागवे, पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, वाहतूक पोलीस निरीक्षक राजेंद्र करणकोट, समाजकल्याण सभापती जितेंद्र बडेकर, जि. प. सदस्या शितल सुजित कांबळे, सुरेखा रमेश हरगुडे, संदेश आव्हाळे, दिलीप वाल्हेकर, पंचायत समिती उपसभापती विद्याताई गायकवाड, सदस्य कुशाल सातव, कृषिराज चौधरी, सुदर्शन चौधरी, अमोल टेकाळे, कोमल गणेश कांबळे, सुषमा मुरकुटे, राणी वाळके यांच्यासह महसूल विभागातील तलाठी, मंडळ अधिकारी, सरपंच, ग्रामसेवक आदी उपस्थित होते.यामध्ये उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्र, निवासी दाखले, सातबारा उतारे, फेरफार, वारस नोंद, ई-मोजणी, तुकडेबंदी नियमितीकरण, पीएम किसान, नमो किसान सन्मान निधी, संजय गांधी निराधार योजना, दिव्यांग योजना तसेच ग्रामपंचायत करसंबंधित प्रश्नांवर मोठ्या प्रमाणात अर्ज सादर करण्यात आले. विविध प्रकरणांचा जागीच निपटारा करण्यात आला. तसेच काही लाभार्थींना प्रातिनिधिक स्वरूपात दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

## केंब्रिज ज्युनिअर कॉलेजचा बारावी बोर्ड परीक्षेत १०० टक्के निकाल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** जिल्ह्यात शैक्षणिक गुणवत्तेत अग्रेसर असलेल्या केंब्रिज हाय इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेजचा बारावी बोर्ड परीक्षा २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. अशी माहिती संस्थेचे संचालक दत्तात्रय पवार यांनी दिली.

या परीक्षेत साक्षी सुरेश शिंदे हिने ८६.५० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. सिद्धी संजय हजारे हिने ८२.६० टक्के गुणांसह द्वितीय, तर अरमान सलीम सय्यद याने ८२.५० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

तसेच श्रद्धा विजय भोसले (८०.६७%), तनुश्री अमोल धोंडे (७८.३३%), सायली सुनील गाल्हे (७८.१७%), श्रीयश अभिजित कुलकर्णी (७७.००%), प्रथमेश वैभव पवार (७४.६७%), तुषार रंभाजी खडके (७४.५०%) व विशाल आप्पासाहेब काकड (७४.१७%) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या यशासाठी प्रमोद निर्मळ (रसायनशास्त्र), तोफिक शेख (गणित), रसाळ (जीवशास्त्र) व शुक्ला (भौतिकशास्त्र) यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. संस्थेच्या शैक्षणिक पद्धतीमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असून आयआयटी, जेईई, नीट, सीईटीसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम तयारी करून घेतली जाते, अशी माहिती मॅनेजिंग ट्रस्टी नीता निर्मळ यांनी दिली. प्राचार्य सोळंकी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. उपप्राचार्या पिंकी ठक्कर, पर्यवेक्षक धीरजकुमार सिंग, कार्यालयीन अधीक्षक विपुल भोसले तसेच सर्व विषय शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## श्रीरामपूर बाजार समितीत गावरान कांद्याला १३०० रुपयांचा भाव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** कृषि उत्पन्न बाजार समितीत गावरान कांद्याला प्रतिक्विंटल १३०० रुपयांपर्यंत बाजारभाव मिळाला असून सोमवारी कांद्याच्या ५१५३ गोण्यांची आवक झाली. आवक स्थिर असली तरी बाजारभावात चढ-उतार सुरू असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती सुधीर नवले व प्रभारी सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली.

बाजार समितीत काल झालेल्या लिलावात कांदा नंबर एकला प्रतिक्विंटल १००० ते १३०० रुपये, कांदा नंबर दोनला ७०० ते ९५० रुपये, कांदा नंबर तीनला ५०० ते ६५० रुपये, गोल्टी कांद्याला ५०० ते ९०० रुपये, तर खाद कांद्याला २०० ते ४५० रुपये असा दर मिळाला.

कांद्याची आवक समाधानकारक असून व्यापारी व शेतकऱ्यांमध्ये व्यवहार सुरळीत सुरू असल्याचे बाजार समिती प्रशासनाने सांगितले. सध्या बाजारात गुणवत्तेनुसार दरात फरक पडत असून पुढील काही दिवसांत आवक व मागणीनुसार भावात बदल होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

# संविधानाला जगात तोड नाही : एसपी घार्गे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या भारतीय संविधानाला जगात तोड नाही, असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले. माजी नगरसेविका अनिता ढोकणे यांच्या वतीने आयोजित भीमगीते व पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई



जगधने, नगरसेवक आशिष धनवटे, उद्योजक के. के. आव्हाड, पत्रकार राजेंद्र नारायणे, अरविंद सांगळे, मार्कस बोर्डे, अमोल नरोडे तसेच डॉ. शिवानी क्षीरसागर यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. सोहळ्यास अप्पर पोलीस अधिकारी वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, माजी नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक, ज्येष्ठ पत्रकार मनोज आगे, प्रेस फोटोग्राफर अमोल कदम, नगरसेविका मंजुश्री मुरकुटे, डॉ. रवींद्र जगधने, रिपाइंचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन, महिला आघाडीच्या रमादेवी धिवर आदी उपस्थित होते. तसेच कार्यक्रम उत्सव समितीचे अध्यक्ष राजीव साळवे, उपाध्यक्ष रविंद्र हरार, सचिव दीपक कदम, कार्याध्यक्ष सागर कांबळे, रामदास ढोकणे, सचिन शरणागत, जॉन मोकळ, संजय रूपटक्के, सचिन ब्राह्मणे यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमास मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# बारावी परीक्षेत बोरावके महाविद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** रयत शिक्षण संस्थेच्या रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर येथील इयत्ता बारावी (कला, विज्ञान व एच.एस.सी. व्होकेशनल) शाखांचा मार्च २०२६ परीक्षेचा निकाल उल्लेखनीय लागला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. गुणवंत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवत महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेला उजाळा दिला आहे. कला शाखेत पारखे प्रतिम राजेश्वर याने ९४.१७ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. त्याने मानसशास्त्र विषयात शंभर पैकी शंभर गुण मिळविले. कु. सोरणे सायली रवी हिने ८४.६७ टक्के गुणांसह द्वितीय, तर कु. सोरणे श्रद्धा रवी हिने ८३.३३ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. कला शाखेचा एकूण निकाल ७५ टक्के लागला. विज्ञान शाखेत गोराणे सिद्धेश आणासाहेब याने ८९.६७ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. चोथानी पवित्रा तुषार हिने ८२.८३ टक्के गुणांसह द्वितीय, तर जोशी अवधूत आदिक याने ८२.३३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. विज्ञान शाखेचा निकाल ९४.२९ टक्के इतका लागला. एच.एस.सी. व्होकेशनल शाखेत तेलोरे रुपाली आबासाहेब हिने ७७.१७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. लांबोळे राधिका संजय हिने ७५.५० टक्के गुणांसह द्वितीय, तर काळे रोहिणी कडुबा हिने ७४.५० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. या शाखेचा निकाल ९१.४२ टक्के लागला. या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मीनाताई जगधने यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच महाविद्यालय विकास समिती सदस्य, प्राचार्य डॉ. प्रवीण बडधे, उपप्राचार्य प्रा. डॉ. अनुप दळवी, प्रो. डॉ. शरद शेळके व उपप्राचार्या सुजाता पोखरकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. महाविद्यालयाच्या उज्ज्वल निकालामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पिंप्री लौकी गावचा सिंगल फेज विद्युत पुरवठा सुरळीत करावा, निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वि :** संगमनेर ता पिंप्री लौकी अजमपुर गावचा सिंगल फेज रात्रीचा सहा ते नऊ वीजपुरवठा सुरळीत करावा या मागणीसाठी गावातील ग्रामस्थ सह आश्वी येथील सब स्टेशनचे ज्युनिअर इंजिनिअर यांना निवेदन देऊनही गेले दोन दिवस झाले तरी या गावचा रात्रीचा सहा ते नऊ हा वीज पुरवठा सुरळीत न झाल्यामुळे ग्रामस्थांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असून रात्रीच्या वेळेला या भागात गेली पंधरा दिवसापासून चोरांचा सुळसुळाट व बिबट्याची दहशत यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे तरी येत्या दोन दिवसांमध्ये या गावचा सिंगल फेज वीज पुरवठा सुरळीत न केल्यास आश्वी सबस्टेशनवर तीव्र स्वरूपाचे जन आंदोलन उभारले जाईल असा इशारा या गावचे सामाजिक कार्यकर्ते भारतराव पाटील गीते यांच्यासह ग्रामस्थांनी दिला आहे



त्यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की पिंप्री गावचा पासून सायंकाळचा सहा ते नऊ या वेळेत सिंगल फेज वीज पुरवठा खंडित केला जात आहे. एकीकडे रात्रीचा अंधार याचा फायदा घेऊन चोरांचा ससुळसुळाट झाला आहे तसेच या भागात गेले अनेक दिवसांपासून बिबट्यांचा मुक्त संचार असून त्यामुळे रात्रीचा अंधाराचा गैरफायदा घेऊन ग्रामस्थांवर व पाळीव जाणाऱ्या वर हे बिबटे हल्ले करीत आहेत. सहा ते नऊ या वेळेत वीज पुरवठा खंडित असल्यामुळे लहान मुलांना सध्या उन्हाळा असल्यामुळे उकडयाचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विनंती करूनही या गावचा रात्रीचा सिंगल फेज वीजपुरवठा अधिकारी वर्ग सुरू करीत नसल्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. याबाबत राज्याचे जलसंपदा मंत्री व पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना निवेदनाद्वारे माहिती देण्यात आली आहे. या गावचा खंडित वीज पुरवठा तातडीने सुरू करावा अन्यथा ग्रामस्थांना वेगळा निर्णय घ्यावा लागेल असा इशारा सरपंच संगिता गिते, उपसरपंच बाजीराव गीते, माजी उपसरपंच दौलत दातीर, राजेंद्र गीते, संतोष गीते, अशोकराव गीते, बाबासाहेब दातीर, मोहन दातीर भुसारी यांच्यासह कार्यकर्त्यांनी दिला आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# नसरापूर दुर्घटनेच्या निषेधार्थ संगमनेरमध्ये कॅण्डल मार्च

## आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा द्या; महाराष्ट्रात महिला असुरक्षित : डॉ जयश्रीताई थोरात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे अल्पवयीन चिमुकलीवर वृद्ध नागरिकाने केलेला अत्याचार हा महाराष्ट्रासाठी काळीमा फासणारा आहे. अशा घटना पुन्हा घडू नये यासाठी अत्यंत कठोर कायदा करणे गरजेचे असून अशा नराधमांना तात्काळ मृत्युदंडाची शिक्षा झाली पाहिजे अशी आग्रही मागणी संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ जयश्रीताई थोरात यांनी केली असून नसरापूर घटनेच्या निषेधार्थ संगमनेर मध्ये भव्य कॅण्डल मार्च काढण्यात आला.




संगमनेर शहर व तालुक्यातील नागरिक व महिलांच्या वतीने संगमनेर बसस्थानक येथे नसरापूर घटनेच्या निषेधार्थ भव्य कॅन्डल मार्च काढण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या याप्रसंगी सौ दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे ,काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजय फटांगरे ,शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे, निखिल पापडेजा ,शेखर सोसे, नगरसेवक किशोर टोकसे, विशाल ढोले, सिद्धेश घाडगे ,मनीषा राहणे, प्रियंका जगनर, वनिता गाडे ,विशाल ढोले प्रकाश कडलग, प्राची कवडे ,अर्चना दिघे, प्राजक्ता कुलकर्णी, तनिष्का कुलकर्णी, समीर कुलकर्णी, ललित शिंदे ,शर्मिला हांडे, सुभाष दिघे प्रीतम साबळे ,प्राजक्ता घुले, वृषाली साबळे ,डॉ. अनुराधा सातपुते, सौ सरोज पगडाल, सौ नंदा गरुडकर, यशवंती नरवडे ,श्रीकांत साबळे, शरद पावबाके, सोमनाथ गोडसे ऋत्विक राऊत, शुभम शिंदे ,मयूर घुले, अलोक बर्डे, सुरभी मोरे, वैशाली कडबाने ,अमृता राऊत, तात्याराम कुटे आदींसह शेकडो नागरिक व महिला उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये महिला सुरक्षित नाहीत महिलांवर अन्याय होतो आहे.

विकसित भारत प्रगतशील भारत अशी घोषणा दिली जाते मात्र यामध्ये महिलांवर अत्याचार वाढत आहे. गुन्हेगाराला कोणतीही जात धर्म नसतो अशा गुन्हेगारांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. या लहान मुलीचा काय दोष होता ? असा सवाल करताना घटनेतील नराधमाला अत्यंत कठोर शिक्षा झाली पाहिजे याबरोबर यापुढील काळात महिलांवर कोणताही अत्याचार होणार नाही याकरता कठोर कायदे निर्माण झाले पाहिजे. देशामध्ये दररोज महिलांवर अत्याचार होत आहेत सरकार कोणतीही ठोस कारवाई करत नाही वडगाव पान येथील चिमुकलीवर ॲसिड फेक हल्ल्याला ४५ दिवस होऊन गेले तरी आरोपी अद्याप सापडत नाही. हे दुर्दैवाचे असून छत्रपती शिवाजी महाराज महिलांवरील अत्याचारासाठी चौरंगा करण्याची शिक्षा द्यायचे त्याचप्रमाणे अत्यंत कठोर शिक्षा या घटनेतील आरोपींना द्याव्या अशी मागणी त्यांनी केली. तर सौ दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, मुली सुरक्षित नाहीत लहान मुलींनी शाळेत जायचे कसे. महिला सुरक्षित नाहीत.

दिवसेंदिवस महिलांवर वाढणारे अत्याचार हे अत्यंत दुर्दैवी आहे या अत्याचारातील नराधमांना मृत्यू दंडापेक्षाही कठोर शिक्षा झाली पाहिजे जेणेकरून यापुढे कोणीही अशी अत्याचार करण्याची हिम्मत करणार नाही. तर डॉ. मैथिलीताई तांबे म्हणाल्या की, एक आई म्हणून, एक स्त्री म्हणून मुलींची काळजी वाटत आहे सरकारने वेळ न दवडता तातडीने अत्यंत कठोर कारवाई येणारा धमाल करावी त्याचप्रमाणे यापुढील काळात महिलांची काळजी घेणारे कायदे कातडीने निर्माण करावी अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी प्रांताधिकारी अरुण उंडे यांनी निवेदन स्वीकारले यावेळी पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्यासह शासकीय अधिकारी उपस्थित होते. या कॅन्डल मोर्चासाठी संगमनेर शहर व तालुक्यातील विविध नागरिक महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

द•ख•ल

### वकील संघाच्या सदस्य पदी ॲड. गायकवाड यांची निवड



**घुलेवाडी** : आश्वी बु. प्रतापपूर येथील ड. अरुण गायकवाड यांची संगमनेर वकील संघाच्या सदस्य पदी निवड करण्यात आली. ड गायकवाड हे अतिशय सामान्य कुटुंबातील असून ते गेल्या पाच वर्षांपासून संगमनेर कोर्टात ड प्रशांत गव्हाणे यांच्या सोबत वकिली करत आहेत. अगदी थोड्या कालावधी मध्ये ड गायकवाड यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला खेड्या पाड्यातील अनेक गरीब लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी पर्यंत केले.अनेक गरीब लोकांच्या केसेस कमी फी घेऊन प्रामाणिकपणाने त्या केसेस लढण्याचे काम केले. ॲड. गायकवाड यांनी त्यांचे वकिलीचे शिक्षण ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय संगमनेर येथे पूर्ण केले. शिक्षणा दरम्यान प्रा. राहुल देशमुख यांचे ड गायकवाड यांना मोलाचे मार्गदर्शन मिळाले.अत्यंत हलाखीच्या परिस्थिती एका बाजूला घराची जबाबदारी दुसऱ्या बाजूला शिक्षणाची जबाबदारी या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळून रात्री नाईट शिप रंजन उद्योग समूह निमगावजाळी या ठिकाणी काम करून वकिलीचे शिक्षण जिद्दीने पूर्ण केले. ॲड गायकवाड यांची वकील संघाच्या सदस्य पदी निवड झाल्यामुळे त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### पुणतांब्यात श्री तुळजाभवानी माता मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा

**पुणतांबा** : पुणतांबा येथे श्री तुळजाभवानी माता मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि. ७ मे ते रविवार दि. १० मे दरम्यान हा सोहळा उत्साहात पार पडणार आहे. गुरुवार रोजी सायंकाळी मूर्ती व कलशाची ग्राम प्रदक्षिणा काढण्यात येणार आहे. शुक्रवारी सकाळी गणेशपूजन होऊन विजयानंद गिरी महाराज, पुणतांबा यांच्या हस्ते कार्यक्रमास प्रारंभ होणार आहे. शनिवारी प्रातः पूजन, मूर्ती समापन विधी पार पडणार असून सायंकाळी ह.भ.प. बाळासाहेब महाराज रंजाळे यांचे हरिकीर्तन होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. रविवार रोजी प्रातःपूजन, उत्तरांभ, श्रीमूर्ती प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण व पूर्णाहुतीचे कार्यक्रम होणार आहेत. दुपारी महंत मधुसुदनगिरीजी महाराज यांच्या हस्ते कलश व मूर्ती स्थापना तसेच कीर्तन होणार आहे. सायंकाळी जागरण व गोंधळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या संपूर्ण कार्यक्रमाचे आचार्यपद पंकज खुळे हे भूषविणार आहेत. ग्रामसचिवालय इमारतीसमोर होणाऱ्या या धार्मिक सोहळ्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री छगन जोगदंड मित्रपरिवार व पंचक्रोशीतील पुणतांबा ग्रामस्थांनी केले आहे.

### नसरापूर अत्याचार प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी; मागणी



**संगमनेर** : नसरापूर येथील अल्पवयीन बालिके वरील अत्याचार व हत्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आरोपीस तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी ठाम मागणी भारतीय जनता युवा मोर्चा व भाजप संगमनेर यांच्या वतीने शहर पोलीस निरीक्षक समीर बारावकर यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे देण्यात आले. नसरापूर येथील घटना अत्यंत गंभीर व संतापजनक असून संपूर्ण राज्यभर तीव्र संतापाची लाट उसळली आहे. अशा विकृत प्रवृत्तीला वेळीच आळा घालण्यासाठी कठोरात कठोर शिक्षा होणे आवश्यक आहे. आरोपीला फाशीची शिक्षा देऊन समाजात कायद्याचा धाक निर्माण करावा, अशी मागणी भाजप युवा मोर्चा उत्तर नगर जिल्हाध्यक्ष रोहित चौधरी, भाजप शहराध्यक्ष पायल ताजणे, तालुका ध्यक्ष श्रीकांत गोमासे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार, भाजयुमो संगमनेर शहराध्यक्ष आकाश शहाणे, अविनाश फटांगरे, माझी शहराध्यक्ष सीताराम मोहरीकर, ऋषिकेश मुळे, शशांक नामन, राहुल भोईर आदींसह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# आश्वी परिसरातील चोऱ्यांमुळे खळबळ

## पोलिसांसमोर आरोपींना पकडण्याचे मोठे आव्हान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील आश्वी आणि परिसरात गेल्या काही दिवसांपासून घरफोड्या आणि दिवसाढवळ्या होणाऱ्या चोऱ्यांनी ग्रामस्थांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण केले आहे. सततच्या या घटनांमुळे पोलिसांसमोर आरोपींना पकडण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले असतानाच, खळी येथील नागरिकांनी कमालीची सतर्कता दाखवत एका संशयित व्यक्तीला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. या संशयिताला सोमवारी (दि. ४) न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

रविवारी (दि. ३) सायंकाळी ८ वाजेच्या सुमारास खळी येथील मंदिर परिसरात एक अनोळखी व्यक्ती संशयास्पदरीत्या वावरताना दिसून आली. स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखून त्याला त्याचे नाव, गाव आणि तिथे येण्याचे कारण विचारले असता, त्या व्यक्तीने कोणतीही माहिती देण्यास स्पष्ट नकार दिला. त्याच्या संशयास्पद हालचाली आणि वागण्यामुळे नागरिकांनी त्याला तातडीने पकडून ठेवले आणि या घटनेची माहिती आश्वी पोलिसांना दिली. रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा संगमनेर दौरा असल्याने पोलीसांचा लवाजमा संगमनेर येथे होता.

मात्र, घटनेची माहिती मिळताच आश्वीचे सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट, सहायक पोलीस उपनिरीक्षक दीपक बर्डे, पोलीस हवालदार अमोल गोसावी आणि नामदेव बिरे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी या संशयित व्यक्तीला ताब्यात घेऊन त्याची अंगझडती घेतली, मात्र त्याच्याकडे कोणत्याही आक्षेपार्ह वस्तू आढळून आल्या नाहीत. प्राथमिक तपासणीत सदर व्यक्ती परप्रांतीय असल्याचा अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. तर, सोमवारी (दि. ४) या संशयिताला न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने अधिक तपासासाठी त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, सध्या आश्वी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील वाड्या-वस्त्यांवर अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असल्याने पोलीस रात्रीच्या वेळी अत्यंत दक्षतेने गस्त घालत आहेत. या संशयित आरोपीच्या चौकशीतून चोऱ्यांच्या सत्राचे काही धागेदोरे पोलिसांच्या हाती लागतात का, याकडे आता संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे. नागरिकांनी देखील सतर्क राहून कोणत्याही संशयास्पद हालचालींची माहिती तात्काळ पोलिसांना द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

---

# नेवासा येथे भाजपच्या वतीने विजयाचा जल्लोष



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : शहरात भाजपच्या वतीने पश्चिम बंगाल,आसाम आणि पुदुचेरी विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीने मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाचा आनंद नगरपंचायत चौक येथे फटाके फोडुन व पेढे वाटून जल्लोषात साजरा करण्यात आला. यावेळी भाजपा अध्यक्ष मनोज आण्णा पारखे, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वरजी पेचे,नगरसेवक निरंजन भाऊ डहाळे, अजितसिंह नरुला,राजेंद्र मुथ्था यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी जय श्रीरामभारतीय जनता पार्टीचा विजय असो अशा घोषणा देत उपस्थित नागरिकांना पेढे वाटले.तर भाजप पदाधिकाऱ्यांनी एकमेकांना पेढा भरून विजयाचा आनंदोत्सव साजरा केला. यावेळी जेष्ठ भाजपा नेते भास्कर कणगरे,माजी नगराध्यक्ष दत्तात्रय बर्डे,भाजपा आयटी जिल्हाध्यक्ष आदिनाथ पटारे, सरचिटणीस आप्पा गायकवाड, कृष्णा डहाळे, सचिव विलास बोरुडे, गोरक्षनाथ बेहळे, युवा मोर्चा उपाध्यक्ष तुषार कारंडे, रोहित लष्करे,दिनेश गुंजाळ, अमोल पिटेकर, अविनाश सोनवणे, रामदास लष्करे, श्रीराम लष्करे, अझरुद्दीन शेख, सिदीक चौधरी,बापूसाहेब दारकुंडे, राजेंद्र मुथा, अनिल शिंगी, किरण भोसे, मनोज डहाळे, राजेश कडु,राम सचदे आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

---

### भरतनाट्यम कथक नृत्य स्पर्धेत विद्यार्थ्यांचे यश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : नुकत्याच पुणे येथे शिवांजली डान्स अकॅडमीच्या नॅशनल लेव्हलवर पार पडलेल्या भरतनाट्यम कथक डान्स स्पर्धेमध्ये लोणी येथील नृत्यांगण डान्स अकॅडमीच्या विद्यार्थिनी काव्या खर्डे, आराध्या उंडे, इरा नवले, विभा खोंड,अन्वी बोराडे, श्रावणी मरकड व प्राप्ती ब्राह्मणे यांनी सादर केलेल्या भरतनाट्यम समूह नृत्यास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले आहे. या स्पर्धेत स्पर्धकांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्यांना भरतनाट्यम गुरु प्रणिता शिंदे, अनन्या काळे, आदित्य टंकवाल व श्रुती मैड यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशवंत विद्यार्थिनी यांचे पालक, गुरु व नृत्यांगण डान्स अकॅडमी, लोणी (खुर्द) यांनी अभिनंदन केले आहे.

### श्रीमती जानकीबाई आदिक विद्यालयात संगणक साक्षरतेचा स्तुत्य उपक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : नेवासा तालुक्यातील भानसहिवरे येथील संत ज्ञानेश्वर बी.एड. कॉलेजच्या छात्र-अध्यापकांनी सामाजिक बांधिलकी जपत संगणक साक्षरतेचा स्तुत्य उपक्रम राबविला. बी.एड. अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून तालुक्यातील अशोकनगर येथील श्रीमती जानकीबाई आदिक विद्यालयात हा उपक्रम उत्साहात पार पडला.

या उपक्रमात आयटी समन्वयक ज्ञानेश्वर त्रिभुवन यांनी विद्यार्थ्यांना संगणकाचे आधुनिक युगातील महत्त्व, विविध उपयोग व फायदे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवनात संगणकाचा वापर केल्यास कामे अधिक सोपी, जलद आणि कार्यक्षम कशी होतात, याचे त्यांनी उदाहरणांसह विवेचन केले. यावेळी उपस्थित पालकांनाही संगणक साक्षरतेविषयी माहिती देण्यात आली. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सिंधू आदिक यांनी उपक्रमाचे कौतुक करत संत ज्ञानेश्वर बी.एड. कॉलेजच्या विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रसाद मुंडलिक यांनी केले.

सूत्रसंचालन प्रशांत धंदक यांनी केले, तर आभार प्रदर्शन आतिश ठोकळ यांनी मानले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी सोमेश्वर कोतकर, अमोल थोरात, गणेश सोलट, योगेश बोठे, अलिशा सुतार, वैशाली ठोंबरे, तृप्ती म्हस्के, सुजाता घाडगे, पूजा आढाव, ऐश्वर्या सोनवणे, फिजा पटेल आणि पूजा खेडकर यांनी विशेष परिश्रम घेतले. बेल्हेकर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेश पाटील बेल्हेकर, डॉ. रंजनाताई बेल्हेकर, प्राचार्या स्वाती गव्हाणे, प्रा. मनिषा भोईटे व प्रा. शेखर जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संगणकाविषयी जागरूकता निर्माण होत असून आधुनिक युगाशी सुसंगत कौशल्यांचा पाया अधिक भक्कम होत असल्याचे अधोरेखित झाले.

---

# कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना पिक विम्याची ९.६६ कोटी नुकसान भरपाई : आ. काळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कोळपेवाडी** : कोपरगाव तालुक्यात मागील वर्षीच्या खरीप हंगाम २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे काढणीला आलेल्या खरीप हंगामातील पिके भुईसपाट होऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्यावेळी झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्याच्या सूचना महसूल आणि कृषी विभागाला दिल्या होत्या.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिक विम्याची जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळावी यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरु होता. त्या पाठपुराव्यातून कोपरगाव तालुक्यातील जवळपास १५ हजार शेतकऱ्यांना पंतप्रधान पिक विमा योजेन अंतर्गत उत्पादन आधारित ९.६६ कोटी नुकसान भरपाई रक्कम महायुती शासनाने मंजूर करून हि रक्कम नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली असल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली आहे.

गेल्या वर्षीच्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे कोपरगाव तालुक्यातील अनेक गावांना अतिवृष्टीचा फटका बसून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते. या अतिवृष्टीमुळे अनेक शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे काढणीला आलेल्या सोयाबीन, बाजरी,कापूस, तूर, चारा पिके आदी शेकडो हेक्टर पिकांचे मोठे नुकसान होवून खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला होता.सर्व पिके बहरात असतांना शेतकऱ्यांच्या पदरात काही तरी पडेल अशी अपेक्षा होती परंतु ऐन काढणीच्या वेळी खरीप पिकावर आलेल्या अतिवृष्टीच्या या नैसर्गिक संकटामुळे शेतकऱ्यांनी पाहिलेले स्वप्न चक्काचूर होवून अगोदरच अडचणीत असलेला शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला होता. या आर्थिक अडचणीतून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी पिक विमा कंपनी कडून लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळावी यासाठी सातत्याने महायुती शासनाकडे पाठपुरावा सुरु होता. त्या पाठपुराव्याची दखल घेवून महायुती शासनाने कोपरगाव तालुक्यातील नुकसानग्रस्त १५ हजार शेतकऱ्यांना ९.६६ कोटी नुकसान भरपाई रक्कम मंजूर केली आहे. त्यामुळे निश्चितच शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून खरीप हंगाम २०२६ च्या तयारीसाठी आर्थिक मदत होणार आहे.

खरीप हंगामातील पिके उभे करण्यासाठी आवश्यक असलेले आर्थिक भांडवल उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंता दूर झाल्या आहेत. त्यामुळे नुकसान भरपाई मिळवून देणाऱ्या आमदार आशुतोष काळे यांचे कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी आभार मानले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ९.६६ कोटी नुकसान भरपाई रक्कम जमा झाली आहे त्यामुळे बळीराजा पुन्हा नव्या हिम्मतीने उभा राहणार आहे.

त्याबद्दल आमदार आशुतोष काळे यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कृषी मंत्री ना.दत्तामामा भरणे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने आभार मानले आहे.

---

# यश हा परमात्म्याचा गुण : महंत रामगिरी महाराज

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील उंदिरगाव येथे सद्गुरु गंगागिरी महाराज यांच्या कृपेने व ब्रह्मलीन नारायणगिरी महाराज यांच्या आशीर्वादाने आयोजित अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व कीर्तन महोत्सव भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. महंत रामगिरी महाराज तसेच परमपूज्य भास्करगिरी महाराज यांच्या अधिपत्याखाली हा सोहळा पार पडला.

दि. २४ एप्रिल ते १ मे २०२६ या कालावधीत स्व. भास्करराव पाटील गलांडे विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या सप्ताहात राज्यातील नामवंत कीर्तनकारांनी कीर्तन सेवा सादर केली. काल्याच्या कीर्तनावेळी मार्गदर्शन करताना महंत रामगिरी महाराज म्हणाले, मन मोकळे करण्याचा मार्ग म्हणजे मंदिर आहे. जीवनातील परमार्थातील प्रेम निरपेक्ष असते.

जसे मुलासाठी आई सर्वस्व असते, तसे भक्तांच्या जीवनात परमार्थ असतो. माणसाच्या जीवनात यश हा परमात्म्याचा गुण आहे. त्यांच्या प्रभावी विचारांनी भाविक मंत्रमुग्ध झाले. यावेळी उंदिरगाव ग्रामस्थांनी गावात भव्य शिवस्मारक उभारण्याची इच्छा व्यक्त केली. या मागणीला पाठिंबा देत महंत रामगिरी महाराज यांनी लवकरात लवकर शिवस्मारक उभारावे, असे आवाहन ग्रामस्थांना केले. महंत रामगिरी महाराज यांच्या शुभहस्ते दहीहंडी फोडून कीर्तन महोत्सवाचा समारोप करण्यात आला. उंदिरगावसह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी कीर्तनाचा लाभ घेतला. कार्यक्रमानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

---

# बोरावके कॉलेजमध्ये हॉटेल मॅनेजमेंट विषयावर कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : येथील रा. ब. नारायणराव बोरावके कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून 'फाउंडेशन कोर्स इन हॉटेल मॅनेजमेंट' सुरू होत असून, त्या पार्श्वभूमीवर हॉटेल मॅनेजमेंट विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. प्रमुख व्याख्यात्या म्हणून सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड येथील हॉटेल मॅनेजमेंट व केटरिंग टेक्नॉलॉजी विभागाच्या प्रा. सीमा खटावकर उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रो. डॉ. अनुप दळवी होते. प्रा. खटावकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, बदलत्या काळात पुस्तकी शिक्षणाबरोबर कौशल्याधारित व्यावसायिक शिक्षणाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. हॉटेल मॅनेजमेंट हा कोर्स विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या नव्या संधी निर्माण करणारा असून, देश-विदेशात रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध करून देतो. हा कोर्स दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनाही करता येतो आणि वयाची मर्यादाही नाही. या कोर्समध्ये फूड प्रॉडक्शन, हाऊसकीपिंग, अन्न व पेय सेवा विभाग तसेच रिसेप्शन व्यवस्थापन या चार प्रमुख घटकांना विशेष महत्त्व असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मोठ्या हॉटेल्स, कंपन्या, क्रूझ सेवा यांसह स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठीही हा कोर्स उपयुक्त ठरतो. ग्रामीण भागातील तरुणांसाठी हा रोजगाराच्या नव्या वाटा खुल्या करणारा कोर्स असल्याचे त्यांनी सांगितले. मीनाताई जगधने, प्राचार्य प्रो. डॉ. प्रवीण बडधे यांनी कार्यशाळेचे कौतुक केले. अध्यक्षीय समारोपात डॉ. अनुप दळवी यांनी हा कोर्स तरुणांना स्वावलंबी बनविणारा असल्याचे सांगितले. प्रास्ताविक कोर्सचे चेअरमन व उपप्राचार्य प्रो. डॉ. शरद शेळके यांनी केले. प्रा. डॉ. सोनल कोल्हे यांनी परिचय करून दिला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. प्रगती जाधव यांनी केले, तर आभार डॉ. योगिता रांधवणे यांनी मानले. कार्यशाळेस प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पाहिजेत**

**छत्रपती संभाजीराजे ग्रामिण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या. पारनेर ता. पारनेर जि. अहिल्यानगर.**

**कार्यक्षेत्र - संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा.**

संस्थेच्या पारनेर शहर, टाकळी ढोकेश्वर, सुपा, धोत्रे, बेलवंडीफाटा, अळकुटी, या शाखांमध्ये काही पदे भरणे आहे. तरी इच्छुकांनी संस्थेच्या वरील कोणत्याही शाखेत स्वहस्ताक्षरात दि. १६ मे २०२६ पर्यंत लेखी अर्ज कार्यालयीन वेळेत (९ते ५वा पर्यंत.) कागदपत्रासह सादर करावा.

| अ.न | पद | पदसंख्या | शिक्षण | तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | वसुली अधिकारी | १ | कोणत्याही शाखेची पदवी व संगणक ज्ञान आवश्यक | वसुली क्षेत्राच्या कामाचा किमान २वर्ष अनुभव |
| २ | शाखाधिकारी | ४ | कोणत्याही शाखेची पदवी किंवा १२ वी उत्तीर्ण व संगणक ज्ञान आवश्यक | सहकार किंवा बँकिंग क्षेत्राचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| ३ | कॅशिअर/क्लार्क/ दैनिक प्रतिनिधी | ३ | १० वी किंवा १२ उत्तीर्ण व संगणक ज्ञान आवश्यक | सहकार किंवा बँकिंग क्षेत्राचा अनुभव असल्यास प्राधान्य |

दि. १६ मे २०२६ पर्यंत अर्ज केलेल्या किंवा मुलाखतीच्या दिवशी अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांनी मुलाखतीसाठी दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत संस्थेच्या मुख्यकार्यालयात उपस्थीत रहावे.

मुख्यकार्यालय- श्रीराम मंदिरासमोर, नवीपेठ, पारनेर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर.
फो नं -०२४८८-२२२६६६

आपले विनीत
चेअरमन व्हॉ. चेअरमन / संचालक मंडळ / मॅनेजर
छत्रपती संभाजीराजे ग्रामिण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या. पारनेर

# पान १ वरुन

## अक्षय कर्डिले १,१२,५८७ मतांनी विजयी!

सुमारे २७ फेऱ्या होत्या. प्रत्येक फेरीमध्ये अक्षय कर्डिले यांनी आघाडी घेत शेवटच्या २७ व्या फेरीत समोरच्या उमेदवारांना पराभूत करीत सुमारे १ लाख १२ हजार ५८७ मतांनी आघाडी घेऊन अक्षय कर्डिले यांनी निर्विवाद विजयश्री प्राप्त केली. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाक्यांच्या आतषबाजीत व मोठ्या जल्लोषात कर्डिले साहेब अमर रहे अशा घोषणा देत नवनिर्वाचित आमदार अक्षय कर्डिले यांचे स्वागत केले. दुपारी अकरा वाजल्यानंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले व अक्षय कर्डिले मोठ्या मताधिक्याने विजय होणार हे अधोरेखित झाले. अक्षय कर्डिले शेवटच्या फेरीनंतर एक लाख ४० हजार ९३ मते अक्षय कर्डिले यांच्या पारड्यात पडली. यावेळी विरोधी उमेदवारांना पडलेली मते, गोविंद मोकाटे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार यांना २७,५०६ इतकी मते पडली तर उद्धव ठाकरे गटाचे बंडखोर उमेदवार रावसाहेब देवरे यांना ७,२९९ मते पडली. वंचित आघाडीचे संतोष चोळके यांना ५६९० तर अथर्व म्हसे यांना- ११४८ सुरेश लांबे यांना १३६८ तर महेश हापसे यांना- २०५१ आणि नोटा मध्ये १६३३ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. यावेळी राष्ट्रवादी शरद चंद्र पवार पक्षाच्या उमेदवारासह सर्व विरोधी उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले.

दुपारी मतमोजणी केंद्रावर आमदार अक्षय कर्डिले यांच्यासह पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार संग्राम भैय्या जगताप यांचे आगमन झाले. यावेळी कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. मतदारांचे आभार मानताना आमदार अक्षय कर्डिले म्हणाले की हा विजय माझा नसून हा विजय माझ्या वडिलांना समर्पित करीत आहे. ते पुढे म्हणाले की, हा विजय माझा नसून सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा आहे हा विजय मी माझ्या वडिलांना समर्पित करीत आहे. माझ्या वडिलांनी ३० ते ४० वर्ष रक्ताचे पाणी करून सर्वसामान्य जनतेची सेवा केली आज माझा वाढदिवस आहे परंतु तीस वर्षात पहिल्यांदाच माझ्या वाढदिवसाला माझे वडील नाही ही माझ्यासाठी खूप मोठी दुःखाची घटना आहे. वास्तविक पाहता हा गुलाल व हा जल्लोष मला अजिबात सुखावणारा नाही परंतु कार्यकर्त्यांनी या सर्व गोष्टीचे नियोजन करून मला आग्रह करून मला भाग पाडले. यावेळी त्यांनी सांगितले की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कर्डिले साहेब यांचे ऋणानुबंधाचे नाते होते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पितृतुल्य राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार सुजय विखे पाटील, आमदार संग्राम भैय्या जगताप, आमदार मोनिकाताई राजळे, या सर्वांनी मोठ्या प्रमाणात कष्ट घेऊन माझ्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहून मला साथ दिली व माझ्या वडिलांची मला उणीव भासू दिली नाही याचा मला अभिमान आहे. मुख्यमंत्री साहेबांनी मला संबोधित केले की तुमचे कुठलेही काम मी अडवणार नाही व त्यांच्या नियोजनामुळे मला कुठलीही कमतरता व तुमच्या कामासाठी अडचण येणार नाही मी शेवटच्या क्षणापर्यंत आपल्या कामासाठी बांधील राहील याचे आश्वासन मी देतो. यावेळी कार्यकर्त्यांचा जल्लोष व आग्रहाखातर नवनिर्वाचित आमदार अक्षय कर्डिले यांची डीजे व गुलालाची उधळण करीत व कर्डिले साहेब अमर रहे अशा घोषणा करीत राहुरीतील श्री शनि मंदिरात जवळ मिरवणुकीचा समारोप करण्यात आला व त्या ठिकाणी आमदार अक्षय कर्डिले यांनी मतदारांचे आभार मानले.

आज पर्यंत जे आमच्या विरोधात होते ते माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनीही माझ्यासाठी माघार घेऊन मला मोलाचे सहकार्य केले. त्यामुळे मी त्यांच्या परिवाराचा त्यांच्या सर्व कार्यकर्त्यांचा आभारी आहे व मी कुठल्याही कामासाठी मागेपुढे पाहणार नाही, सर्वसामान्यांच्या कामाला प्राधान्य देईल.

– आमदार अक्षय कर्डिले

माझे दिवंगत सहकारी शिवाजीराव कर्डिले यांची उणीव अक्षयच्या रूपाने आपल्याला भरून काढायची आहे. त्यामुळे अक्षय कर्डिले यांच्या रूपाने आपल्याला आमदार मिळालेला आहे. कुठल्याही कामात आपल्याला अडचण येणार नाही, असे आश्वासन मी देतो. माजी मंत्री प्राजक्त तनपुरे व त्यांच्या कुटुंबीयांनी अनमोल मदत करून अक्षय यांना आमदार करण्यात मोठा हातभार लावला. त्यांच्या दिलदार मनाचे कौतुक करावे तितके थोडे.

– ना. राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री

दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी जनतेची मनापासून सेवा केली. आता अक्षय कर्डिले यांच्या रूपाने आपण त्यांनाच आमदार म्हणून पाहत आहोत. त्यामुळे त्यांच्या कामगिरीबद्दल कोणीही संकोच बाळगू नये व राहुरी नगर पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील कुठल्याही विकास कामासाठी आम्हा सर्वांचे त्यांना कायमस्वरूपी सहकार्य राहील.

– आ. संग्राम जगताप

## बंगालमध्ये नवा अध्याय: 'बदला' नाही, 'बदलाव' : मोदी

हा अविभाज्य भाग असला, तरी मतदारांनी विकासाच्या बाजूने दिलेला कौल महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बंगाली वेशभूषेत (धोती) उपस्थित राहिलेल्या पंतप्रधान मोदींनी पश्चिम बंगालमधील विजयावर भाष्य करताना म्हटले की, आजपासून बंगाल भयमुक्त झाला असून विकासाच्या विश्वासाने भरला आहे. गंगोत्रीपासून गंगासागरपर्यंत आज कमळच दिसत आहे. बंगालमध्ये आता परिवर्तन झाले असून, हे 'बदला' घेण्याचे नाही, तर 'बदलाव' घडवण्याचे राजकारण आहे. निवडणुकीच्या निमित्ताने होत असलेल्या हिंसाचारावर चिंता व्यक्त करत मोदींनी राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना आवाहन केले की, हिंसेचे हे चक्र आपण एकत्र येऊन मोडून टाकूया. आता भय नाही, तर भविष्याची चर्चा व्हायला हवी. बंगाल आणि केरळमध्ये भाजपाच्या कार्यकर्त्यांनी सोसलेल्या यातनांचा उल्लेख करत मोदी भावूक झाले. त्यांनी हा विजय त्या सर्व कार्यकर्त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना समर्पित केला ज्यांनी पक्षवाढीसाठी स्वतःचे आयुष्य समर्पित केले. अनेक पिढ्यांनी ज्या दिवसाची वाट पाहिली, तो सूर्योदय आज झाला आहे, असे सांगत त्यांनी बंगालच्या जनतेचे आभार मानले. देशातील विविध राज्यांतील मतदानाच्या उच्च टक्क्यावर समाधान व्यक्त करत पंतप्रधान म्हणाले की, पश्चिम बंगालमध्ये ९३ टक्के मतदान होणे, हा एक ऐतिहासिक विक्रम आहे. आसाम, तमिळनाडू, पुदुचेरी आणि केरळमध्येही मतदानाचा नवा विक्रम प्रस्थापित झाला आहे. यात महिलांचा वाढता सहभाग ही भारतीय लोकशाहीची एक सकारात्मक बाजू आहे. या निकालातून भारताने पुन्हा एकदा जगाला दाखवून दिले आहे की, आपला देश लोकशाहीची खरी जननी का आहे.

व्हिजन नसलेल्यांना मतदारांनी नाकारले

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम आणि दूरदर्शी नेतृत्वाखाली देशभरात भाजपा व मित्रपक्षांची विजयी घोडदौड सुरूच आहे. व्हिजन नसलेल्या लोकांना मतदारांनी स्पष्टपणे नाकारत विकासाला भक्कम पाठिंबा दिला आहे. महाराष्ट्र राज्यातील पोटनिवडणुकांमध्येही महायुतीच्या उमेदवारांनी मोठ्या मताधिक्याने दणदणीत विजय मिळवला आहे. हा विजय जनतेच्या विश्वासाचा आणि विकासाभिमुख धोरणांचा विजय आहे. विकासाच्या या प्रवाहात सक्षमपणे सहभागी होऊन महायुतीला साथ दिल्याबद्दल सर्व मतदारांचे मनःपूर्वक आभार!

– आ. अमोल खताळ

## कॅप्टन ख़रातला शिर्डी पोलिसांचा पाहुणचार

पोलीस निरीक्षक रंजीत गलांडे व पीएसआय निवांत जाधव उपस्थित होते. आज त्याला राहाता न्यायालयात हजर करण्यात येणार असून जमीन बळकावणे व सावकारी प्रकरणात पोलीस कोठडीची मागणी होण्याची शक्यता आहे. त्यानंतर समता पतसंस्थेतील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणातही त्याची चौकशी होणार आहे.या कारवाईमुळे शिर्डी परिसरात मोठी चर्चा रंगली असून पुढील तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# 'धान्य पुरवठा सुरळीत करा'

## तालुका काँग्रेसचे वैजापुरात आंदोलन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागामार्फत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअतर्गत शिपत्रिकाधारकांना वेळेवर धान्य पुरवठा होत नसल्याने पात्र लाभार्थी शासनाच्या योजनेपासून वंचित राहत आहेत. याचा निषेध करण्यासाठी वैजापूर तालुका काँग्रस समितीतर्फे काँग्रेसचे तालुका अध्यक्ष राहुल संत यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी तहसील कार्यालयाच्या प्रांगणात धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसीलदार सुनील सावंत व नायब तहसीलदार रामेश्वर महाजन यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेतली व त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच तहसीलदार सावंत यांनी निवेदन स्वीकारले व याबाबतीत सकारात्मक प्रतिसाद दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. तालुक्याच्या शहरी व ग्रामीण भागात कोणत्या तारखेला धान्य पुरवठा केला जातो, मागील सहा महिन्यात कोणत्या तारखेला धान्य पुरवठा करण्यात आला, धान्य वितरणाच्या वेळी स्वस्त धान्य दुकानदारांकडून प्रति दुकान ५०० रुपये वसुल का केले जातात, धान्य वाटपात होत असलेला विलंब याबाबत माहिती देण्याचे निवेदन तहसीलदारांना दिले. डॉ. नितेश शहा, बाबासाहेब गायकवाड, मधुकर साळुंखे,प्रवीण जाधव, सुनील बोडके, रोहित आहेर, शक्यसिंह त्रिभुवन, अक्षय रोठे, सफल त्रिभुवन, साहेबराव पडवळ, प्रवीण खाजेकर, सलीम तांबोळी, विकास सोमवंशी, चंदन राजपूत, राजू शेख उपस्थित होते. फोटो: वैजापूर येथे तालुका काँग्रेस समितीतर्फे तहसीलदार सुनील सावंत यांना निवेदन देण्यात आले.

## सौर प्रकल्प उभा पण पंचक्रोशी अंधारातच ; दिवसाच्या विजेचे स्वप्न हवेतच

### ग्रामस्थांच्या संतापाचा ज्वालामुखी ; आंदोलनाचा इशारा




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर :** नगर तालुक्यातील जेऊर येथे घुरुडी डोंगरावर शेतकऱ्यांना पूर्ण दाबाने दिवसा वीज तसेच अल्प दरात वीज, लोडशेडिंगला ब्रेक अशा मोठ्या चर्चा करून सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. परंतु सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर देखील परिसरामध्ये विजेचा खेळखंडोबा सुरू आहे. विजेच्या लपंडावामुळे यात्रोत्सवाला देखील मोठा फटका बसला. उष्णतेचा पारा मोठ्या प्रमाणात वाढलेला असताना लोड शेडिंग व विजेच्या लपंडावामुळे ग्रामस्थ तसेच महिला वर्गामधून मोठा संताप व्यक्त केला जात आहे.

सौर ऊर्जा प्रकल्प सुरू झाल्यानंतर जेऊर पंचक्रोशीतील विजेच्या समस्या मार्गी लागण्याची अपेक्षा नागरिकांना होती. परंतु सौर ऊर्जा प्रकल्पाची वीज जेऊर उपकेंद्रात दाखल झाली असली तरी पंचक्रोशीतील अंधार मिटता मिटत नसल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. महावितरणच्या मनमानी कारभारा विरोधात नागरिकांमध्ये संतापाचा ज्वालामुखी निर्माण झाला आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा मोठा गाजावाजा करण्यात आला होता. नागरिक ही मोठ्या आशेवर होते. परंतु संपूर्ण घोषणा हवेतच विरल्याने ग्रामस्थांचा संताप टोकाला पोहोचला आहे.

जेऊर गावचे ग्रामदैवत व पंचक्रोशीतील नागरिकांच्या भक्तीचे ठिकाण देवी बायजामातेचा यात्रोत्सव सुरू असून यात्रा उत्सवाला मोठी गर्दी होत असते. यात्रोत्सव काळात भारनियमन होणार नाही अशी अपेक्षा पंचक्रोशीतील नागरिकांना होती. परंतु महावितरण कंपनीला काहीही देणे घेणे नसल्याचेच चित्र जेऊर परिसरात पहावयास मिळाले. यात्रोत्सव काळात भारनियमन तसेच विजेचा लपंडाव सुरूच ठेवण्यात आला. त्यामुळे ग्रामस्थांसह महिला वर्गांमधून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. सौर ऊर्जा प्रकल्पानंतर अंधाराचे साम्राज्य अधिकच गडद झाले असल्याचेही तीव्र भावना नागरिकांमधून व्यक्त केल्या जात आहेत.

दररोज सायंकाळी सहा ते नऊ या महत्त्वाच्या वेळेत लोड शेडिंग सुरू असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. घराघरातील जेवण बनविण्याची, लहान मुलांच्या अभ्यासाची, शेतातून परतलेल्या कुटुंबांच्या विश्रांतीची आणि सध्या सुरू असलेल्या यात्रोत्सवात आलेल्या पाहुण्यांच्या स्वागताच्या वेळीच लोड शेडिंग सुरू आहे. सौर ऊर्जा प्रकल्पातून ना २४ तास वीज, ना पूर्ण दाब, ना कमी दर.. उलट रोजचा विजेचा खेळखंडोबा सुरू आहे. संध्याकाळच्या वेळी वीज गुल होत असल्याने महिलांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे महिलांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

मिक्सर बंद, पाण्याच्या मोटारी बंद, पंखे बंद, स्वयंपाक अर्धवट, लहान मुले घामाघुन अशी परिस्थिती निर्माण होत आहे. उष्णतेचा पारा खूप वाढलेला असून विजेच्या लपंडाव अन् भारनियमनामुळे नागरिक आक्रमक झाले आहेत. सौर ऊर्जा प्रकल्प हा स्थानिकांसाठी केवळ मृगजळ ठरत आहे. तातडीने लोडशेडिंग बंद करून २४ तास सुरळीत वीज पुरवठा द्यावा. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून देण्यात आला आहे.

**सौर ऊर्जा प्रकल्पाचा फायदा नेमका कुणाला ?**

**सौर ऊर्जा प्रकल्पाचा प्रकाश कुठे गेला ? आमच्या घरात मात्र अंधारच का ? सौर ऊर्जा प्रकल्पाचा निश्चित फायदा कोणाला ? कागदावर सौर प्रत्यक्षात अंधार. सौर ऊर्जा प्रकल्प कोणाच्या फायद्यासाठी आम्हाला तर अजूनही चुली समोर आणि अंधारातच जगावे लागते. उजेडाचे स्वप्न दाखवून अंधाराचे साम्राज्य कायम आहे. लोड शेडिंग भूतकाळात जाईल ही अपेक्षा फोल ठरली.अशी उपरोधिक टीका ग्रामस्थांमधून केली जात आहे.**

**अनेकांच्या घरात इन्व्हर्टर नाही परिणामी महिलांना चुलीवर, मोबाईलच्या टॉर्चवर आणि प्रचंड उकाड्यात काम उरकावे लागत आहे. गावचे ग्रामदैवत यात्रा उत्सव कालावधीत देखील भारनियमन बंद करण्यात आले नव्हते. त्यामुळे नागरिकांसह आलेल्या पाहुण्यांना देखील विजेच्या लपंडावाचा मोठा त्रास सहन करावा लागला. यामुळे नागरिकांमधून प्रचंड रोष निर्माण झाला आहे. आक्रमक झालेल्या नागरिकांकडून तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.**

## रमेश यादव



**शिरसगाव** :गणेश मुदगुले व सुरेश मुदगुले यांचे मामा रमेश कारभारी यादव (वय ६७) याचे दुख:द निधन झाले. त्यांचे मागे पत्नी एक मुलगा,एक मुलगी सुना नातवंडे असा परिवार आहे. मनोज यादव यांचे ते वडील होत.

## पांडुरंग दळवी



**श्रीरामपूर :** येथील मेनरोड वरील तत्कालीन सोहम फुटवेअरचे मालक व लोकमान्य मंडळाचे सदस्य पांडुरंग दगडूजी दळवी (वय ७८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे. ते सुहास व सोहम दळवी यांचे वडील व स्व. हंसराज, बाळासाहेब व उत्तमराव दळवी यांचे बंधु होत.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME
HEENA KAUSAR AYUB SHAIKH
( BEFORE NAME )
TO NEW NAME AS
HEENA AJIJ SHAIKH
(AADHAR NO. 9137 3895 2493)
FROM VIDE AFFIDAVIT
BEFORE NOTARY PUBLIC
SHRIRAMPUR
PLACE: SHRIRAMPUR
DATE : 04/05/2026

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME
SAI. YUSUF ALI JULFEKAR ALI
(LEAVING CERTIFICATE)
( BEFORE NAME )
TO NEW NAME AS
YUSUF JULFIKAR SAYYAD
(AADHAR NO. 7287 8121 0921)
FROM VIDE AFFIDAVIT
BEFORE NOTARY PUBLIC
SHRIRAMPUR
PLACE: SHRIRAMPUR
DATE : 04/05/2026

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME
AFROZ TANVIR TAMBOLI
(AADHAR NO. 5128 3692 3732)
( BEFORE NAME )
TO NEW NAME AS
AFROZ TANVEER TAMBOLI
(IN MY DAUGHTERS BIRTH
CERTIFICATE)
FROM VIDE AFFIDAVIT BEFORE
NOTARY PUBLIC SHRIRAMPUR
PLACE: SHRIRAMPUR
DATE : 04/05/2026

# निधन वार्ता

## निवृत्त तहसीलदार सुरेश हरके यांचे निधन



**अहिल्यानगर** - भिंगार येथील रहिवासी निवृत्त तहसीलदार सुरेश विश्वनाथ हरके यांचे सोमवारी ४ मे २०२६ रोजी सकाळी ७.०५ वाजता दीर्घ आजाराने निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते. त्यांच्यावर भिंगार येथील लिंगायत कोष्टी समाजाच्या स्मशानभूमीत सायंकाळी ५.३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे. ध्यानधारणा प्रशिक्षक डॉ. दीपक हरके यांचे ते वडील होत.

## वसंतराव थोरात



**श्रीरामपूर:**तालुक्यातील उक्कलगाव येथील प्रगतशील शेतकरी व सोसायटीचे विद्यमान संचालक वंसतराव मारूती थोरात (वय ६७) यांचे निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी,एक बंधू, दोन मुले,एक मुलगी,पुतणे,सूना,जावई, नातवंडे,असा मोठा परिवार असून, प्रताप व सिद्धार्थ यांचे ते वडील तर, बाळासाहेब गणपत थोरात यांचे ज्येष्ठ बंधू होत.

## केशरबाई डुकरे



**आंबी** : राहुरी तालुक्यातील आंबी येथील जुन्या पिढीतील केशरबाई भाऊसाहेब डुकरे ( वय ९२) यांचे वृद्धपकाळात निधन झाले.त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातू, पणतू, पुतणे असा मोठा परिवार आहे. आंबी सहकारी सोसायटीचे विद्यमान चेअरमन बाळासाहेब डुकरे व मच्छिंद्र डुकरे यांच्या मातोश्री होत.

## छबबाई लोखंडे



**टाकळीभान :** येथील कॉम्रेड पक्षाचे कट्टर समर्थक स्वर्गीय नानासाहेब लोखंडे (वय ७५) यांच्या पत्नी छबबाई नानासाहेब लोखंडे यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात तीन मुली,दोन मुले व सुना- नातवंडे असा मोठा परिवार असून, सेवानिवृत्त सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी रामभाऊ लोखंडे तसेच एसटी कामगार सेवानिवृत्त लक्ष्मण लोखंडे यांच्या त्या मातोश्री होत.

## शेषराव खंडागळे



**श्रीरामपूर,** : तालुक्यातील टिळकनगर इंडस्ट्रीजचे माजी कर्मचारी शेषराव भानुदास खंडागळे (रा. गायकवाड वस्ती, वय ७४) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी, १ भाऊ, सुना, पुतणे व जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते तिलोक जैन हायस्कूल पाथर्डीचे शिक्षक श्रावण सरी आर्केट्राचे गायक बिपीन खंडागळे व नितीन खंडागळे यांचे वडील, तसेच रीक्षा चालक प्रकाश खंडागळे यांचे थोरले बंधु व राजु खंडागळे यांचे ते चुलते होत.

## सुनेत्रा पवारांची विक्रमी 'एन्ट्री'!

यांचा विक्रम अग्रस्थानी होता, तो आता सुनेत्रा पवार यांनी मोडीत काढला आहे. विजयानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सुनेत्रा पवार भावूक झाल्या होत्या. त्या म्हणाल्या, अजित पवारांच्या निधनानंतर ही पहिलीच निवडणूक आहे. अशापद्धतीने निवडणुकीला सामोरे जावे लागेल, असे मला कधीच वाटले नव्हते. बारामतीकरांनी अजित पवारांनी केलेल्या विकासकामांचे प्रतीक म्हणून ही 'भावांजली' वाहिली आहे. जनतेने माझ्यावर दाखवलेला हा विश्वास माझ्या खांद्यावरील जबाबदारी वाढवणारा आहे. शरद पवार, अजित पवार आणि सुप्रिया सुळेंनी बारामतीत जे काम आणि विश्वास निर्माण केला, त्याच विश्वासावर जनतेने शिक्कामोर्तब केले आहे. या निकालामुळे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचा आत्मविश्वास द्विगुणित झाला असून, कार्यकर्त्यांमध्ये जल्लोषाचे वातावरण पसरले आहे.

फटाक्यांची आतिषबाजी आणि गुलालाची उधळण करत बारामतीकरांनी या ऐतिहासिक विजयाचे स्वागत केले आहे. एकतर्फी लढत आणि विरोधकांची पीछेहाट या निवडणुकीत २३ उमेदवार रिंगणात होते, मात्र विरोधकांकडून प्रभावी लढत नसल्याने ही निवडणूक एकतर्फी ठरली. दुसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या न्यू राष्ट्रीय समाज पक्षाच्या उमेदवाराला केवळ ५३४ मते मिळाली, तर नोटाला ४७५ मते मिळाली. अभिजित बिचुकले (२००) आणि करुणा मुंडे (१७२) यांनाही नगण्य मते मिळाली. ५८.२७ टक्के मतदानाची नोंद झालेल्या या निवडणुकीत बारामतीकरांनी महायुतीच्या बाजूने एकमुखी कौल दिला आहे. ही निवडणूक माझ्यासाठी केवळ विजय नाही, तर बारामतीकरांनी अजित पवारांच्या विकासकामांना वाहिलेली 'भावांजली' आहे. त्यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला, तो सार्थ करण्याची जबाबदारी आता माझ्या खांद्यावर आहे.

- सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री

## अहिल्यानगरमध्ये भाजपा कार्यकर्त्यांचा जल्लोष अन् हाणामारीही!

झालेल्या प्रकारावर पडदा टाकण्यात आला. या प्रकाराची दिवसभर शहरात दबक्या आवाजात चर्चा सुरू होती. भाजपाची देशात सर्वत्र विजयी घोड दौड चालू असताना पश्चिम बंगाल, पाँडिचेरी घवघवीत यशा बरोबरच आसाममध्ये ही भाजपाने हॅट्रिक करून सत्ता कायम ठेवली. त्याचबरोबर महायुती मधील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या बारामती विधानसभा मतदारसंघात पावणेदोन लाख या मतांनी प्रचंड मोठा विजय झाला. यावेळी विरोधकांचे डिपॉझिट जप्त झाले. तर नगर राहुरी पाथर्डी विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर पोटनिवडणुकीत कै. शिवाजीराव कर्डिले यांचे सुपुत्र अक्षय कर्डिले यांना भाजपाने उमेदवारी दिली होती. या निवडणुकीत अक्षय कर्डिले यांचा दणदणीत विजय झाला. यामुळे भाजपा कार्यकर्ते यांनी आनंद उत्सव साजरा केला. या निकालानंतर अहिल्यानगर भाजपाचे जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या नेतृत्वाखाली भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला पदाधिकारी, युवकांनी शहरातील भिंगारवाला चौकात एकत्र येऊन जय भवानी जय शिवाजी, जय श्रीराम च्या घोषणा देऊन जल्लोष केला. याच वेळी भाजपा पदाधिकाऱ्यांनी पेढे, रसगुल्ले तसेच बंगाली भेळ याचे वाटप करून फटाक्यांची आतिषबाजी केली. दरम्यान सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास भाजपाच्या लक्ष्मी कारंजा चौकातील कार्यालयासमोर भाजपा प्रमुख पदाधिकाऱ्यांनी जुन्या नव्या कार्यकर्त्यांसह एकत्र येऊन फटाके फोडून विजय उत्सव साजरा केला. याच वेळी भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष रुद्रेश अंबाडे आणि अजिंक्य गुरावे यांच्यात चेष्टा मस्करीतून वादावादी झाली. ही वादावादी इतकी टोकापर्यंत गेली की, त्याचे पर्यावसन हाणामारी पर्यंत गेले. यावेळी दोघांमध्ये गुद्दा गुद्दी होऊन एकमेकांची झोंबा झोंबी झाली. यावेळी अंबाडे यांचा शर्ट फाटलाचा प्रकारही घडला. विशेष म्हणजे भाजपा जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या समोरच हा सर्व प्रकार घडल्याने प्रमुख पदाधिकाऱ्यांनी तात्काळ हस्तक्षेप करून हे भांडण मिटवून त्यावर पडदा टाकला. हे प्रकरण पोलिस ठाण्यापर्यंत जाऊ देऊ नका ? अशी तंबीही यावेळी पदाधिकाऱ्यांनी दिल्याची माहिती उपस्थितांमधून व्यक्त केली जात आहे. एकीकडे भाजपाच्या निवडणुकीतील विजयाचा जल्लोष चालू असताना दुसरीकडे भाजपा पदाधिकाऱ्यांमध्ये झालेल्या भांडणामुळे या आनंदोत्सवाला गालबोट लागल्याची चर्चा दिवसभर शहरात दबक्या आवाजात सुरू होती. या संदर्भात काही भाजपा पदाधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता त्यांनी या घटनेला दुजोरा दिला. मात्र काही पदाधिकाऱ्यांनी किरकोळ घटना असल्याचे सांगून त्यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

## स्कोडा ऑटो इंडियाची सीएससी ग्रामीण ई-स्टोअरसोबत भागीदारी




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक :** स्कोडा ऑटो इंडियाने भारतातील नॉन-मेट्रोपॉलिटन आणि निमशहरी भागांमध्ये विस्तार करण्यासाठी कॉमन सर्व्हिसेस सेंटर (सीएससी) ग्रामीण ई-स्टोअरसोबत धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली आहे. या सहकार्याद्वारे देशातील अनेक नवीन प्रदेशांतील ग्राहकांना कायलाक, कुशाक आणि स्लाव्हिया ही वाहने उपलब्ध करून देण्यासाठी सीएससीच्या विस्तृत डिजिटल आणि फिजिकल नेटवर्कचा लाभ घेणाऱ्या काही मोजक्या प्रीमियम ऑटोमोटिव्ह ब्रँड्सपैकी स्कोडा ऑटो इंडिया एक बनली आहे. या भागीदारीविषयी बोलताना स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड डायरेक्टर आशिष गुप्ता म्हणाले, स्कोडा ऑटो इंडियामध्ये आमचा विकासाचा प्रवास नवीन बाजारपेठांमध्ये उपलब्धता वाढविणे आणि प्रासंगिकता निर्माण करणे यावर आधारित आहे. विश्वासार्ह स्थानिक नेटवर्कच्या सामर्थ्याला आमच्या विविध उत्पादन पोर्टफोलिओसोबत जोडून उपलब्धतेतील तफावत दूर करण्यास सीएससी ग्रामीण ई-स्टोअरसोबतच्या आमच्या भागीदारीमुळे आम्हाला मदत होणार आहे. यामुळे भारतीय ग्राहकांसाठी तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण होणार आहे. या उपक्रमामुळे स्कोडा ऑटो ग्राहकांच्या अधिक जवळ येणार आहे, त्यामुळे भौगोलिकदृष्ट्या त्यांचे स्थान कुठेही असले तरी ते आमच्या उत्पादनांचा आणि सेवांचा अधिक सोयीस्करपणे अनुभव घेऊ शकतील. तसेच यामुळे एक अधिक समावेशक व सुलभ मोबिलिटी इकोसिस्टिम निर्माण होईल. हायब्रीड रिटेल मॉडेलद्वारे उपलब्धतेचा विस्तार भारतातील गैर-महानगरीय शहरांमध्ये व्यापक उपस्थिती असलेले सीएससी नेटवर्क हे ज्यांना पूर्वी ऑटोमोटिव्ह ब्रँडच्या पर्यायांपर्यंत मर्यादित प्रवेश होता अशा ग्राहकांसाठी एक महत्त्वपूर्ण संपर्कबिंदू म्हणून काम करेल. या एकात्मिक मॉडेलद्वारे, स्कोडा ऑटो इंडिया खालील गोष्टी साध्य करेल:

**✻ नवीन आणि अपरिचित बाजारपेठांमध्ये शेवटच्या टप्प्यापर्यंतची पोहोच वाढविणे.**

**✻ डिजिटल मदतीने माहिती मिळवणे आणि खरेदी करणे सुलभ करणे.**

**✻ स्थानिक उद्योजकांच्या माध्यमातून ग्राहकांचा सहभाग अधिक दृढ करणे.**

**✻ अखंड वितरण आणि सेवेसाठी विद्यमान डीलरशिपच्या पायाभूत सुविधांचा लाभ घेणे.**

या भागीदारीचा एक भाग म्हणून, कायलाक, कुशाक आणि स्लाव्हिया ही वाहने सीएससीच्या ग्रामीण ई-स्टोअर प्लॅटफॉर्मद्वारे उपलब्ध करून दिल्या जातील. यामुळे उत्पादनांविषयीची चौकशी आणि खरेदी प्रक्रिया सुलभ होईल. त्याला स्कोडा ऑटो इंडियाच्या डीलरशिप नेटवर्कचे पाठबळ मिळून पूर्तता आणि वितरण होईल.

द•ख•ल



## ज्युनिअर कॉलेजच्या उज्वल यशाची परंपरा कायम

**अहिल्यानगर** : भिंगार येथील प्रियदर्शनी पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज च्या विद्यार्थ्यांनी इयत्ता बारावी सायन्स १००% निकालाची परंपरा कायम राहिली आहे. बारावी परीक्षेमध्ये स्वामी राहुल साळुंखे याने ८८.३३ % गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान पटकावला.तसेच यथार्थ श्रीकांत गवळी ८८.१७%, अनुष्का सुनील सांगळे ८६.८३ %,मृण्मयी दत्तात्रेय गिरमे ८६.५० %आणि संकेत सुभाष जाधव ८५.५०% गुण मिळवून कॉलेजच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला. संस्थेचे अध्यक्ष श्री बाळासाहेब खोमणे सर, कॉलेजच्या प्राचार्य श्रीमती अंजली बोधक मॅडम, उपप्राचार्य श्री अमोल घोरपडे सर व पर्यवेक्षक कु.अनिता थापा मॅडम आणि सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## केडगाव स्पोर्ट्स ॲकॅडमीचे ७ खेळाडू बास्केटबॉल संघात

**अहिल्यानगर** : सातारा येथे होणाऱ्या सब ज्युनिअर बास्केटबॉल स्पर्धेसाठी केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या सात खेळाडूंची अहिल्यानगर सब ज्युनिअर संघात निवड झाली आहे. मुलांमध्ये ध्रुव गुगळे, आदिराज कोतकर, कृष्णा ठुबे, क्रांतिक बढदे , शिवराज भस्मे ,मुलीमध्ये,तनिष्का बारहाते, अक्षरा कोतकर यांचा समावेश आहे. नुकतेच सातारा येथे महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल असोसिएशन सब ज्युनिअर स्पर्धेला प्रारंभ झाले असून, या स्पर्धेमध्ये सदर खेळाडू अहिल्यानगर संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. खेळाडूंना प्रशिक्षक छबुराव कोतकर व स्वाती बारहाते यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर, ऊर्जा गुरुकुल शाळेच्या संचालिका कल्याणी फिरोदिया, ज्ञानसाधना गुरुकुल कलासेसचे संचालक प्रा. प्रसाद जमदाडे, डॉ. देवेश कुमार बारहाते, विक्रम लोखंडे, यांनी खेळाडूंचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## राक्षी गावचा सखाराम जुंबड बनला पोलिस उपनिरिक्षक

**शेवगाव** : अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील राक्षी येथील सुपुत्र सखाराम जुंबड



यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या(चझडउ) पोलिस उपनिरीक्षक परिक्षेत देदीप्यमान यश मिळवले आहे. ३० एप्रिल रोजी जाहीर झालेल्या २०२३ च्या निकालात सखाराम यांनी ४०० पैकी ३६७ गुण मिळवून गुणवत्ता यादीत ५१वा क्रमांक पटकावला . महाराष्ट्र पोलिस दलात कर्तव्य बजावत असतानाच त्यांनी अत्यंत मेहनतीने विभागीय परीक्षेद्वारे हे यश संपादन केले. सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या सखाराम यांनी आई वडील, मोठा भावाच्या कष्टाचे चीज करत ६१५ जगासाठी झालेल्या चुरशीच्या लढतीत बाजी मारली. त्यांच्या या यशाबद्दल राक्षी या गावात आनंदाचे वातावरण असून, पोलिस दलातील सहकाऱ्यांकडून आणि गावकऱ्यांकडून त्यांचा जिद्दीचे कौतुक होत आहे.




## आव्हाणे येथे अंगारकी निमित्त धार्मिक कार्यक्रम

**ढोरजळगांव** : शेवगांव तालुक्यातील आव्हाणे बु. येथील ग्रामदैवत श्री स्वयंभू गणेश देवस्थानात अंगारकी चतुर्थी निमित्त यात्रा उत्सव व विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. ५ मे रोजी सकाळी आरती व महाभिषेक कळमकर परीवार व प्रकाश गुगळे यांच्या हस्ते होणार आहे. साडेनऊ ते साडे अकरा या वेळेत ह.भ.प. भागवताचार्य नरेंद्र महाराज गुरव (मालेगाव) यांचे कीर्तन होणार असून भाविकांना कळमकर व गुगळे या दात्यांच्या वतीने फराळाचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रा कमिटीने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून रक्तदान शिबिराचेही आयोजन केले असून, अधिकाधिक नागरिकांनी स्वयंस्फुर्तीने रक्तदानासाठी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संयोजक तथा देवस्थानच्यावतीने केले आहे. अहिल्यानगर येथील अष्टविनायक ब्लड बॅकेचे पथक रक्त संकलन करणार आहेत. सायंकाळी ७ वा शिवाजी जिवडे यांच्या हस्ते श्रीची आरती व महाभिषेक होणार असून रात्री ९ वा महाप्रसादाचे आयोजन काकडे परिवार यांच्यावतीने करण्यात आले आहे. तरी या धार्मिक कार्यक्रमांचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन श्री गणपती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष मालोजी भुसारी,सरचिटणीस अर्जुनराव सरपते,कार्यालयीन सचिव लक्ष्मणराव मुटकुळे व माजी विश्वस्त अंकुश कळमकर,रामदास दिवटे,कारभारी तळेकर, नारायण जाधव यांनी केले आहे.

# पिंडालाही शिवणार नाही..!
# कावळ्याची शेवगाव पोलिस ठाण्यातच आत्महत्या

दादासाहेब डोंगरे । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : कुणी आत्महत्या का करतं? तर आयुष्याला कंटाळून. आता आयुष्याला कुणी का कंटाळतं? तर भोवताली मनासारखं घडलं नाही तर, जिवनाचा कंटाळा येतो म्हणून.. विवाहितेची आत्महत्या, शेतकऱ्याची आत्महत्या, विद्यार्थ्यांची आतहत्या, हे शब्द महाराष्ट्राला नवीन नाहीत. आत्महत्या या भोवतालच्या निष्ठूर कार्यशैलीचे किंवा अस्ताव्यस्त यंत्रणेचे प्रतिक समजलं जातं. माणसं आत्महत्या करतात, पण भोवतालच्या अकार्यक्षम वातावरणाला कंटाळून पक्षाने आत्महत्या केली तर? वाचायला



हास्यास्पद किंवा अकल्पनीय वाटतं, पण हे घडलंय. शेवगाव पोलिस ठाण्याच्या आवारात चक्क एका कावळ्याने आत्महत्या केलीय. कावळ्याच्या याच आत्महत्येची सध्या तालुकाभर चर्चा रंगलीय.

मडक्यातील पाण्याची कथा आठवतेय? हो, तीच जिच्यात हुशार कावळा चोचीने दगड टाकून पाणी वर आणतो व स्वतःची तृष्णा भागवतो. या गोष्टीतून कावळा

**आत्महत्येचे कारण काय?**

चायना मांजाला राज्यभर बंदी आहे. मांज्याने अनेक अपघात झाल्याच्या घटनाह घडल्यात. थेट न्यायालयानेही चायना मांज्यावर कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. परंतु तरीही शेवगावात अनेक दुकानांत राजरोसपणे मांजा विक्री झालाय. अनेकांनी याच मांज्याने पतंगही उडवलेत. शेवगाव पोलिसांच्या याच दुर्लक्षामुळे व्यथित झालेल्या कावळ्याने आत्महत्या केली असावी, अशी गमतीने म्हटले जातेय.

किती हुशार असतो, हे आपल्याला बालपणीच समजले. हिंदू धर्मात पितृपक्षात किंवा दशक्रिया विधीत काकस्पर्शाला अनन्य साधारण महत्व असते. म्हणजेच कावळा माणसाच्या अगदी जवळचा समजला जातो. याच कावळ्याने चक्क शेवगाव पोलिस ठाण्याच्या आवारातील झाडाला दोराने लटकून आत्महत्या केली. कावळ्याने पोलिसांच्या कार्यशैलीला कंटाळून आत्महत्या केली का? या चर्चांना उधाण आलेय.

शेवगाव तालुक्यात चोरी, खून, दरोडे, अवैध धंदे बोकाळलेत. नवीन वर्ष सुरु होऊन चार महिने झाले, परंतु एकाही गंभीर प्रकणाचा तपास लागलेला नाही. बोधेगावातील टोळीयुद्ध, शेवगाव शहरातील ढाकणे वस्तीजवळील खून प्रकरण, मटका, जुगार, वाळूतस्करी, याशिवाय सोशल मीडियावरुन बदनामी, मारहाण, ऑनलाईन फसवणूक आणि दागिने चोरी या सगळ्या घटनांनी उच्चांक गाठलाय. परंतु शेवगाव पोलिस या घटनांना आळा घालू शकलेले नाहीत किंवा त्या थांबवूही शकलेले नाहीत. पोलिसांच्या याच कार्यशैलीवर सध्या शेवगावकरांमध्ये प्रचंड नाराजी आहे. माणसेच काय पण शेवगावातील पशु-पक्षीही पोलिसांवर नाराज असल्याची ही घटना उघडकीस आलीय. शेवगाव पोलिस ठाण्याच्या आवारातील लिंबाच्या झाडाची एक फांदी गोपनीय शाखेच्या वरती गेलीय. याच फांदीला असलेल्या पतंगाच्या मांज्यात अडकून एका कावळ्याचा मृत्यू झालाय. आता ज्या मांज्याला बंदी आहे तोच मांजाकडे जर शेवगाव पोलिस दुर्लक्ष करत असतील तर आत्महत्येशिवाय पर्याय नाही, असंच कदाचित या कावळ्याला वाटलं असावं. त्यामुळेच त्याने या झाडाच्या फांदीला लटकून आपला जीव दिल्याच्या चर्चा शेवगावकरांमध्ये रंगल्यात. अर्थात, शेवगाव पोलिसांनी या चर्चांकडेही दुर्लक्ष केलं, अशाही चर्चा आहेत. आत्महत्या केलेल्या या कावळ्याला पाहायला, पोलिस ठाण्याच्या आवारात मात्र अनेकजण भेट देताना दिसताहेत.

## कोणत्याही समस्येवरील उत्तर म्हणजे उल्हास दुगड : मुथा

### भा. फि. हायस्कूलचे मुख्याध्यापक दुगड यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे सखोल अभ्यासू, खेळाडू व्यक्तिमत्वाने आपल्या तत्त्वांशी तडजोड न करता आजपर्यंत नियोजनबद्धतेमुळे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या गुणवत्तेतील प्रगतीचा आलेख उंचावत नेलेला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाची विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व संस्थेस आजही खरोखरच गरज असल्याचे प्रतिपादन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष अशोक मुथा यांनी केले.

भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक उल्हास दुगड यांच्या सेवापूर्ती सोहळ्यास संस्थेचे खजिनदार प्रकाश गांधी, विश्वस्त मंडळाचे सदस्य गौरव मिरीकर, सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी, तसेच अशोकभाऊ फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक प्रभाकर भाबड, माजी मुख्याध्यापक अजय कुमार बारगळ, बाबुराव ठोकळ, विजयकुमार जगदाळे, कुसुम मावची, उपमुख्याध्यापक दत्तात्रय पानमळकर, रावसाहेब बाबर, सुषमा चिटमील, पोपटराव पवार, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, बाणेश्वर विद्यालयाचे माजी



मुख्याध्यापक बाळासाहेब वाकचौरे, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे उपमुख्याध्यापक कैलास साबळे, पर्यवेक्षक वैभव कुलकर्णी, कल्पना पाठक तसेच शिक्षक वृंद, कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना मुथा यांनी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या विकासामध्ये त्यांचा खारीचा वाटा आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नसल्याचे सांगून, त्यांच्या कार्याचा आढावा घेतला.

संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी उल्हास दुगड सरांच्या नियोजनबद्ध कामाचे, प्रामाणिकपणाचे, तत्वांशी तडजोड न करता प्रगतीचा आलेख उंचावत नेणाऱ्या कामाचे कौतुक करून त्यांना त्यांच्या पुढील निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या व संस्थेस उल्हास दुगड सारख्या मुख्याध्यापकांची गरज असल्याचे सांगून, निवृत्तीनंतर त्यांची उणीव भासणार असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी, गौरव मिरीकर, मुख्याध्यापक प्रभाकर भाबड, माजी मुख्याध्यापक अजय कुमार बारगळ, माजी उपमुख्याध्यापक रावसाहेब बाबर , उज्वला कळमकर, विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळासाहेब वाव्हळ, वैभव कुलकर्णी तसेच विद्यालयाच्या ज्येष्ठ अध्यापिका सुलभा कुलकर्णी, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील पंडित यांनी आपल्या मनोगतातून सरांच्या विकास कामाच्या आठवणींना उजाळा दिला.

एक आदरयुक्त भीती असणारे, वार्षिक कामाचे उत्तम नियोजन, समान कामाची विभागणी, योग्य पद्धतीने काम करून घेण्याचा हातखंडा असलेले, विद्यार्थी प्रिय, तसेच असे प्रास्ताविकेतून गंधाली पटवर्धन यांनी सांगितले.

## म्हस्के विद्यालयाची निकालात उज्वल परंपरा कायम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव संचलित काकासाहेब म्हस्के माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नागापूर या विद्यालयाने फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (एच.एस.सी.) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. यंदा विद्यालयाचा एकूण निकाल ८८.४६ टक्के लागला आहे. या परीक्षेसाठी एकूण १५६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, प्रथम श्रेणीत ९, द्वितीय श्रेणीत ९६ तर तृतीय श्रेणीत ३३ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

शाखानिहाय निकालात विज्ञान शाखेने सर्वाधिक यश मिळवत ९७.४० टक्के निकाल नोंदविला आहे. विज्ञान शाखेत ७७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी ७५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेचा निकाल ८८.०९ टक्के लागला असून ४२ पैकी ३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेचा निकाल ७०.२७ टक्के लागला असून ३७ पैकी २६ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष मा. आ. डॉ. नरेंद्रजी घुले पा. साहेब, मा. आ. चंद्रशेखर घुले पा. साहेब, जि.प. अध्यक्षा ना. सौ. राजश्रीताई घुले पा., पं. स. सभापती डॉ. क्षितिज (भैय्या) घुले पा. साहेब, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. के. वाय. नजन सर, संस्था समन्वयक श्री. विजय काशिद सर, प्राचार्या सौ. शितल बांगर तसेच प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनंदा धामणे यांनी अभिनंदन केले. विद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धतीमुळे आणि शिक्षकांच्या परिश्रमांमुळेच हा यशाचा आलेख उंचावत असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

## डॉ. शेळके दांपत्याच्या वैद्यक आणि समाजसेवेचा गौरव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : डॉ.भावना आणि डॉ. अरविंद शेळके दांपत्याने मागील ५ दशके अहिल्यानगरच्या पंचक्रोशीतील रुग्णांची आणि वंचितांची आपल्या ज्ञान आणि क्षमतांद्वारे निरपेक्ष सेवा केली. त्यांच्या संस्कारांना स्मरून त्यांची मुलगी डॉ. कविता करीर आणि मुलगा समीर यांनी डॉ शेळके यांचे घर सामाजिक उपक्रमासाठी समर्पित करून एकाद्भुत प्रेरणा समाजाला दिल्याचे प्रतिपादन नगर जिल्ह्याचे माजी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले.

भिंगार मधील डॉ. भावना आणि डॉ. अरविंद शेळके सेवा प्रेरणा केंद्राचे काल लोकार्पण झाले. यावेळी यावेळी श्री.घार्गे,भिंगार छावणी मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी, भिंगार डॉक्टर संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत गांधी, इंडियन मेडिकल असोसिएशनचे अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष डॉक्टर सी. डी. मिश्रा, ज्येष्ठ स्त्री रोग तज्ञ डॉ. शैलजा निसळ आणि एचआयव्ही एड्स बाधितांसाठी गेली चार दशके कार्यरत डॉ. मार्सिया वॉरन , स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनीचे संस्थापक प्रमोद मुळे, जनकशेठ अहुजा , डॉ. प्रीती आणि डॉ. हेमंत देशपांडे , डॉ.सुचित तांबोळी,भूलतज्ञ डॉ. संगीता आणि डॉ.शिरीष कुलकर्णी, रेडिओलॉजिस्ट डॉ. स्वाती आणि डॉ. सुहास घुले आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. स्नेहालय संस्थेस डॉ. शेळके यांच्या दोन्ही मुलांनी आपल्या आई-वडिलांची वास्तू सेवाकार्यासाठी सुपूर्द केली. येथे संकटग्रस्त महिलांसाठी स्नेहाधार हेल्पलाइन डॉ. अंशू मुळे यांनी आभार मानले.

## अनुराधा मिश्रा यांना 'स्ट्राँग वुमन ऑफ महाराष्ट्र २०२६' किताब

### मिश्रा यांनी शहराचे नाव उंचावले : संपत बारस्कर



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : नाशिक जिल्ह्यातील लासलगाव येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत अहिल्यानगरच्या अनुराधा रत्नेश मिश्रा यांनी अप्रतिम कामगिरी करत तीन सुवर्ण पदके पटकावली. यासोबतच त्यांना 'स्ट्राँग वुमन ऑफ महाराष्ट्र २०२६' हा मानाचा किताबही बहाल करण्यात आला. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक संपत बारस्कर यांच्या हस्ते मिश्रा यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अरंडे सर, दिपक दहे, कारभारी शेंडे, मेजर सचिन पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. अनुराधा मिश्रा यांनी पॉवरलिफ्टिंग, बेंच प्रेस आणि डेडलिफ्ट या तिन्ही प्रकारांमध्ये दमदार प्रदर्शन करत सुवर्ण पदकांची कमाई केली. विशेष म्हणजे, अनुराधा मिश्रा यांनी यापूर्वीही आशियाई पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. संपत बारस्कर म्हणाले की, अनुराधा मिश्रा यांनी पॉवरलिफ्टिंगसारख्या कठीण क्रीडा प्रकारात राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

## नसरापूर अत्याचार प्रकरण; नराधमास फाशीची मागणी

### रिपाईचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे ३ वर्षीय चिमुरडीवर झालेल्या अमानुष लैंगिक अत्याचार व निर्घृण हत्येच्या घटनेने संपूर्ण राज्य हादरले आहे. या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) यांच्या वतीने आरोपीला तातडीने फाशीची शिक्षा सुनावण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात पक्षाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी पंकज आशिया यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के यांच्यासह दानिश शेख, विजय शिरसाठ, गुलाम शेख, स्वप्नील साठे, अभिजित पंडित, योहान चाबुकस्वार, जमीर सय्यद, चिकू गायकवाड,



निजाम शेख, जावेद सय्यद, इम्रान शेख, संपदा म्हस्के, मनीषा गायकवाड, विश्रांती पठारे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, भीमराव कांबळे या विकृत प्रवृत्तीच्या व्यक्तीने केवळ तीन वर्षांच्या निष्पाप चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिची दगडाने ठेचून अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या केली. ही घटना संपूर्ण मानवतेला काळिमा फासणारी असून, समाजमनाला सुन्न करणारी आहे. या घटनेमुळे पुरोगामी महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेली आहे, असेही निवेदनात म्हटले आहे.

विशेष म्हणजे, संबंधित आरोपीवर यापूर्वीही लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल होता आणि त्याने शिक्षा भोगून बाहेर आल्यानंतर पुन्हा असे घृणास्पद कृत्य केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे अशा प्रवृत्तीच्या गुन्हेगारांना जिवंत राहण्याचा अधिकार नाही, असे तीव्र मत रिपाइच्या वतीने व्यक्त करण्यात आले.

तसेच, बाल लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी लागू असलेला 'पॉक्सो' कायदा (झजउडज) अधिक कठोर करण्याची मागणी करण्यात आली आहे. अशा गुन्ह्यांमध्ये आरोपी कोणत्याही परिस्थितीत सुटू नये, यासाठी न्यायव्यवस्थेत आवश्यक त्या सुधारणा करण्याची गरज असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. हे प्रकरण फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून आरोपीला लवकरात लवकर फाशीची शिक्षा सुनावावी, जेणेकरून भविष्यात अशा प्रकारचे कृत्य करण्याचे धाडस कोणालाही होणार नाही, असा इशाराही देण्यात आला आहे.

आरोपीस कठोर शिक्षा झाली नाही तर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# जनगणना कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण द्या

## महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : जनगणना २०२६ राष्ट्रीय कार्यात योगदान देणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण कवच देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेने केली आहे. या संदर्भात जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया साहेब यांची भेट घेण्यात आली. या भेटीमध्ये अनेक विषयांवर सविस्तर चर्चा करून निवेदन देण्यात आले.

जनगणना फिल्ड ट्रेनर, प्रगनक आणि पर्यवेक्षक यांना विमा संरक्षण देणे. कोविड ड्युटी विमा प्रमाणेच जनगणना कर्मचाऱ्यांना सुरक्षितता प्रदान करणे.

या विषयाबाबत जिल्हाधिकारी



साहेबांशी चर्चा करण्यात आली सदर विषय हा योग्य असून सर्व कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने संरक्षणात्मक असून आमच्या कार्यालयीन स्तरावरून राज्यस्तरावर आपले निवेदन पाठविले जाईल असे सांगितले. यावेळी संघटनेच्यावतीने खालील प्रमाणे इतर मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

जनगणना कर्मचाऱ्यांना वैयक्तिक आदेश देऊन त्यामध्ये अर्जित रजे सहित इतर लाभांचा उल्लेख करण्यात यावा.

दिव्यांग कर्मचारी, गंभीर आजारी असणारे कर्मचारी, ५३ प्लस तसेच कमी कालावधी राहिलेले कर्मचारी यांचे आदेश रद्द करण्यात यावेत. कर्मचारी ज्या ठिकाणी सेवा बजावत आहेत त्याच गावातील जनगणना करण्यासाठी त्यांची नियुक्ती करण्यात यावी. प्रशिक्षणाची वेळ सकाळच्या सत्रात करण्यात यावी. विमा संरक्षणासंदर्भात महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना जिल्हा शाखा अहिल्यानगर यांच्यावतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे. त्यासोबत राज्यात देखील संघटना याबाबत पाठपुरावा करत आहे. आजच्या या भेटी प्रसंगी राज्य सहकार्याध्यक्ष राजेंद्र ठोकळ ,माजी जिल्हाध्यक्ष.नानासाहेब गाढवे समवेत जिल्हाध्यक्ष प्रविण झावरे उपस्थित होते.

अभिप्राय कक्ष उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचा महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. जिल्ह्यासाठी अत्यंत भूषणावह बाबीबद्दल महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना, अहिल्यानगर च्या वतीने जिल्हाधिकारी साहेबांचा सत्कार करण्यात आला.

द • ख • ल

## पुणे–हुबळी वंदे भारत एक्सप्रेस सव्वादोन तास ठप्प

**पुरंदर :** पुणे ते हुबळी धावणारी गाडी क्रमांक २०६७० वंदे भारत एक्सप्रेस सोमवार (दि. ४ मे) रोजी तांत्रिक बिघाडामुळे मार्गातच तब्बल २ तास २१ मिनिटे ठप्प झाली. रेल्वे प्रशासनाच्या तत्परतेमुळे गाडी सुरक्षितपणे पुढे रवाना करण्यात आली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, वंदे भारत एक्सप्रेस दुपारी २.१५ वाजता पुणे स्थानकावरून सुटली होती. दुपारी ३.१५ वाजण्याच्या सुमारास कि.मी. ७१/२ (जक्ए पोल ७१/१८) जवळ ए–१ कोचवरील पॅन्टोग्राफची कार्बन स्ट्रिप अचानक तुटल्याने ओव्हरहेड इलेक्ट्रिक (जक्ए) पुरवठा खंडित झाला. त्यामुळे गाडी मार्गातच थांबवावी लागली. घटनेची माहिती मिळताच रेल्वे प्रशासनाने तात्काळ सुरक्षा व्यवस्था केली. लोणंद येथून टॉवर वॅगन घटनास्थळी पाठविण्यात आली. ढट्ट इंचार्ज दीपक व त्यांच्या पथकाने तातडीने दुरुस्तीचे काम सुरू केले. दरम्यान, डखझऋ एस.सी. शर्मा, अडख दनकर आणि प्रधान आरक्षक सतीश पवार यांनी घटनास्थळी बंदोबस्त ठेवला. प्रवाशांना नेकबँडद्वारे परिस्थितीची माहिती देण्यात आल्याने कोणतीही घबराट निर्माण झाली नाही. दुरुस्ती दरम्यान मागील पॅन्टोग्राफ काढून पुढील इंजिनकडील पॅन्टोग्राफद्वारे जक्ए कनेक्शन देण्यात आले. त्यानंतर सायंकाळी ५.३६ वाजता गाडी वाल्हा स्थानकापर्यंत ताशी १० किमी वेगाने रवाना करण्यात आली. वाल्हा स्थानकानंतर गाडीला नियमित वेग देण्यात आला.

## गुणवत्तावाढीसाठी सातत्याने उपक्रम राबविणार ‑ सभापती खुशी बोरुंदिया

**आळंदी :** शिक्षण समितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येतील. आदर्श विद्यार्थी पुरस्कार हा विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा, शिस्तीचा आणि जिद्दीचा गौरव असून यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व स्पर्धात्मक वृत्ती वाढीस लागते, असे मत शिक्षण समिती सभापती खुशी बोरुंदिया यांनी व्यक्त केले. आळंदी नगर परिषद शाळांतील विद्यार्थ्यांचा आदर्श विद्यार्थी पुरस्कार २०२६ सोहळा उत्साहात पार पडला, यावेळी त्या बोलत होत्या.

आळंदी नगरपरिषद शाळा क्रमांक १ ते ४ मधील सुमारे २७०० विद्यार्थ्यांपैकी निवडक ८ विद्यार्थ्यांना आदर्श विद्यार्थी पुरस्कार २०२६ प्रदान करून गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच सांस्कृतिक, क्रीडा व विविध कलागुणांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या उल्लेखनीय कार्याचे कौतुक करणे तसेच इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला असल्याचे मुख्याधिकारी खांडेकर यांनी सांगितले. पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांमध्ये श्रेया किसन कदम, चंद्रकांत सुरेश कदम, विराट अशोक दुगाने, श्रुतिका नारायण भिसे, समाधान मधुकर कुकर, आधारा तुकाराम होले, इश्वरी बाबासाहेब सरवदे आणि समृद्धी मारोती साठे यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांची निवड उपस्थिती, परीक्षेतील गुणांकन, शिष्यवृत्ती निकाल, शालेय उपक्रमातील सहभाग, क्रीडा कामगिरी, शिस्त, सातत्य व चारित्र्य या निकषांवर करण्यात आली यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी विद्यार्थ्यांमधील गुण ओळखून त्यांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. कार्यक्रमास उपनगराध्यक्ष, सभापती, नगरसेवक तसेच नगरपरिषद शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा ६ ते ८ मे दरम्यान पुण्यात

**पुणे :** अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय कबड्डी, कुस्ती, खो–खो व बास्केटबॉल स्पर्धांचे आयोजन ६ ते ८ मे दरम्यान बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात करण्यात आले आहे. या स्पर्धेत देशातील १० राज्यांमधील विविध सरकारी व खासगी विद्युत कंपन्यांचे पुरुष व महिला गटातील एकूण ४१ संघ सहभागी होणार असून सुमारे ५३८ खेळाडू सहभागी होणार आहेत. महाराष्ट्रासह गुजरात, हरियाणा, तेलंगाणा, राजस्थान, उत्तराखंड, पंजाब, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश आणि दिल्ली येथील संघांचा समावेश आहे. कबड्डी, कुस्ती, खो–खो आणि बास्केटबॉलमध्ये पुरुष गटातील सामने रंगणार असून कबड्डी व खो–खोमध्ये महिला गटाचाही समावेश आहे. कबड्डीत पुरुष व महिला गटातील १८ संघ, खो–खोमध्ये ९ संघ, तर कुस्ती आणि बास्केटबॉलमध्ये प्रत्येकी ७ पुरुष संघ अजिंक्यपदासाठी स्पर्धा करतील. स्पर्धेचे उद्घाटन ६ मे रोजी सकाळी ९.३० वाजता ऊर्जा विभाग अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्या उपस्थितीत महावितरण अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमास क्रीडा आयुक्त शीतल तेली–उगले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळ अध्यक्ष जिग्नेश राय, सरचिटणीस नरेश कुमार यांच्यासह महावितरण, महानिर्मिती व महापारेषण कंपन्यांचे संचालक मंडळ उपस्थित राहणार आहे. समारोप व बक्षीस वितरण ८ मे रोजी सायंकाळी ५ वाजता महापारेषण अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजीवकुमार आणि महानिर्मिती अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी यांच्या उपस्थितीत होईल. महावितरण मानव संसाधन संचालक राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन समिती कार्यरत असून पुणे प्रादेशिक संचालक सुनील काकडे अध्यक्ष, महापारेषण मुख्य अभियंता अनिल कोलप आणि महानिर्मिती अधीक्षक अभियंता अशोक घाडगे उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. महावितरण मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके आणि महानिर्मिती प्रतिनिधी पुरुषोत्तम वारजुरकर मुख्य समन्वयक म्हणून कार्यरत आहेत.

# बारामतीकरांनो..आपण दाखवलेला विश्वास, प्रेम आणि पाठिंबा माझ्यासाठी अत्यंत मोलाचा : सुनेत्रा अजित पवार

## सुनेत्रा पवार २१८९३० विक्रमी मतांनी विजयी..

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** बारामतीकरांनो आपण दाखवलेला विश्वास, प्रेम आणि पाठिंबा माझ्यासाठी अत्यंत मोलाचा असून विधानसभा पोटनिवडणुकीत मला भरघोस मतांनी विजयी केल्याबद्दल तमाम मायबाप बारामतीकरांचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी 'एक्स' वर ट्वीट करत आभार मानले आहेत. आदरणीय अजितदादांच्या पश्चात झालेली बारामतीची ही पहिलीच निवडणूक होती.त्यांच्या मार्गदर्शनाची आणि त्यांच्या उपस्थितीची उणीव आज प्रकर्षाने जाणवते; हा विजय माझ्यासाठी केवळ राजकीय यश नसून, आदरणीय दादांच्या कार्याला आणि त्यांच्या स्मृतींना दिलेली खरी आदरांजली आहे. अजितदादांनी महाराष्ट्रासाठी आणि बारामतीसाठी केलेले कार्य, त्यांची जनतेशी असलेली नाळ आणि विकासाची त्यांची दृष्टी आजही प्रत्येकाच्या मनात कायम आहे. त्यांचे विचार आणि संस्कारच मला पुढे जाण्याची ताकद देत आहेत. हा विजय म्हणजे त्यांच्या स्वप्नांना आणि त्यांच्या कार्याला पुढे नेण्याची जबाबदारी आहे, याची पूर्ण जाणीव असल्याचे सुनेत्रा अजित पवार यांनी म्हटले आहे.




यावेळी सुनेत्रा अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व वरिष्ठ नेते, पदाधिकारी आणि सर्व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. तुमच्या अथक परिश्रमामुळेच हा विजय शक्य झाला आहे. तसेच या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्ष, पाठिंबा दिलेले इतर सर्व मित्र पक्ष, विविध संस्था, संघटना यांचेही सुनेत्रा अजित पवार यांनी आभार मानले. शिव–शाहू–फुले–आंबेडकर या महामानवांच्या विचारधारेचा वारसा जपत, आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेब आणि आदरणीय अजितदादांनी दाखवलेल्या मार्गावर चालण्याचा माझा निर्धार कायम राहील.तरुणाई, शेतकरी, महिला, उद्योजक आणि समाजातील सर्वच घटकांना केंद्रस्थानी ठेवून बारामतीच्या विकासासाठी आपण सर्वजण एकत्रितपणे काम करूया असे आवाहन सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी केले. निवडणुका येतात आणि जातात, पण बारामतीचा सलोखा आणि जिव्हाळा कायम राहिला पाहिजे. म्हणूनच कोणताही जल्लोष न करता आपण कामातूनच हा विजय साजरा करूया. बारामतीकरांनी माझ्यावर ठेवलेला विश्वास मी कधीही कमी पडू देणार नाही असा विश्वास व्यक्त करतानाच आपल्या सर्वांच्या सुख–दुःखात सदैव खंबीरपणे उभी राहीन, अशी खात्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली. आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने, बारामतीच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध राहिन असा शब्दही सुनेत्रा अजित पवार यांनी दिला.

**बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत मला भरघोस मतांनी विजयी केल्याबद्दल तमाम मायबाप बारामतीकरांचे मनः पूर्वक आभार.आपण दाखवलेला विश्वास, प्रेम आणि पाठिंबा माझ्यासाठी अत्यंत मोलाचा आहे. बारामतीकरांनी माझ्यावर ठेवलेला विश्वास कधीही कमी पडू देणार नाही.आपल्या सर्वांच्या सुख–दुःखात सदैव खंबीरपणे उभी राहीन; सुनेत्रा अजित पवार यांनी दिला शब्द.**

## निस्वार्थ सेवेतूनच खरा परमार्थ साकारतो

### पोलीस निरीक्षक पल्लवी मेहेर

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**वाघोली :** आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील गरजू व वंचित मुलांच्या संगोपनासह त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाच्या माध्यमातून निवासी स्वरूपात कार्यरत असलेल्या भूमी फाउंडेशन,वाघोली (पुणे) या संस्थेच्या सेवाभावी कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.या पार्श्वभूमीवर निस्वार्थ भावनेतून केलेला सेवाभाव हाच खरा परमार्थ घडवतो,असे प्रतिपादन वाघोली पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक पल्लवी मेहेर यांनी केले.

यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, खाकी वर्दीत काम करताना अनेकदा समाजातील कठोर वास्तवाला सामोरे जावे लागते.मात्र,भूमी फाउंडेशनसारख्या उपक्रमांमुळे माणुसकी अजूनही जिवंत असल्याचा



दिलासा मिळतो.या मुलांच्या डोळ्यांतील आशा आणि त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य हेच खऱ्या सेवाभावाचे प्रतीक आहे.त्यांनी पुढे नमूद केले की,अशा संस्थांना समाजातून सतत सातत्याने पाठबळ मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

यावेळी अभियंता रोहित मेहेर यांनी आपल्या मनोगतात सांगितले, आजच्या स्पर्धात्मक युगात समाजासाठी निस्वार्थ भावनेने कार्य करणारे हात फार कमी झाले आहेत.समाजाला एक कुटुंब म्हणून जपण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. भूमी फाउंडेशनसारख्या संस्था केवळ मुलांचे भविष्य घडवत नाहीत, तर समाजाच्या मूल्यांची जपणूकही करतात.

# पुणे विद्यापीठ विभागीय क्रीडा समिती सभा संपन्न

## साहेबराव ढमढेरे महाविद्यालयास संयोजनाचा मान

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती आणि शिक्षण प्रसारक मंडळाचे साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित क्रीडा समितीची द्वितीय सभा नुकतीच संपन्न झाली. साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालयात आयोजित केलेल्या या सभेचा महाराष्ट्र गीत आणि पुणे विद्यापीठ गीताने प्रारंभ करून इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानचे सचिव विरसिंह रणसिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या बैठकीचे उदघाटन करण्यात आले. यावेळी विभागीय क्रीडा समितीचे सचिव प्रा. डॉ. अमेय काळे यांनी मान्यवरांचे स्वागत करून शैक्षणिक वर्ष २०२५ – २६ मधील क्रीडा समितीच्या कार्याचा सविस्तर आढावा घेतला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पराग चौधरी यांनी मान्यवरांचा सभेस परिचय करून दिला. यावेळी रणसिंग यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी सातत्याने विविध उपक्रम राबवणे काळाची गरज असून विद्यापीठाने त्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांकडे गुणवत्ता आणि क्षमता असतेच. मात्र त्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे गरजेचे असल्याचे रणसिंग यांनी यावेळी सांगितले. स्वागताध्यक्ष महेशबापू ढमढेरे व प्राचार्य डॉ अर्जुन मुसमाडे यांनी उपस्थित क्रीडा शिक्षकांना मार्गदर्शन केले. यावेळी शैक्षणिक वर्ष २०२५ – २६ मध्ये विविध महाविद्यालयांतील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तसेच शैक्षणिक वाटचालीत विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या क्रीडा संचालकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या वतीने उत्कृष्ट शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालकांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



तळेगाव ढमढेरे(ता.शिरूर) येथे पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार स्वीकारताना कळंब वालचंदनगर येथील विश्वासराव रणसिंग महाविद्यालयाचे विरसिंह रणसिंग, प्राचार्य डॉ. अशोक काळंगे व इतर मान्यवर.

याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक सुदाम शेळके, इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानचे सचिव विरसिंह रणसिंग, विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. रमेश गायकवाड, शिक्षण प्रसारक मंडळ आणि विद्या सहकारी बँकेचे विद्यमान संचालक महेशबापू ढमढेरे, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अर्जुन मुसमाडे, सचिव डॉ. अमेय काळे, प्राचार्य डॉ. पंडित शेळके, प्राचार्य बी.पी. पाटील, प्राचार्य डॉ. अशोक काळंगे, डॉ . जयवंत बाबर, डॉ . रावसाहेब गरड यांसह विविध मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. सदर सभेचे सुत्रसंचालन प्रा. डॉ. संदीप सांगळे यांनी केले तर डॉ. सुहास भैरट यांनी आभार मानले.

## बेकायदेशीर दारू विक्रीचा सुळसुळाट

### प्रशासनाचे दुर्लक्ष उघड

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**वळती (ता. आंबेगाव) :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात परवान्याविना देशी दारूची सर्रास विक्री सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या बेकायदेशीर प्रकारामुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवन असुरक्षित झाले असूनही राज्य उत्पादन शुल्क विभाग व स्थानिक पोलिस प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने संतापाची लाट उसळली आहे.तालुक्यातील अनेक बार, हॉटेल्स तसेच रस्त्यालगत उभारलेल्या ढाब्यांमधून खुलेआम गावठी दारू विकली जात असल्याची माहिती स्थानिकांनी दिली. विशेष म्हणजे, अनेक ठिकाणी कोणताही वैध परवाना नसतानाही हा व्यवसाय बिनधास्तपणे सुरू आहे. काही व्यावसायिकांना राजकीय पाठबळ असल्यामुळे कायद्याचे सर्रास उल्लंघन करूनही त्यांच्यावर कारवाई होत नसल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे.या अवैध दारूविक्रीमुळे परिसरातील सामाजिक वातावरण ढासळत चालले आहे. मद्यधुंद व्यक्तींकडून होणाऱ्या गैरप्रकारांमुळे महिला, शाळकरी विद्यार्थी आणि ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकत असल्याची चिंताजनक बाबही समोर येत आहे.दरम्यान, 'ढाबा संस्कृती'च्या नावाखाली सुरू असलेल्या या बेकायदेशीर धंद्यांवर कोणताही प्रभावी अंकुश नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. अनेक ठिकाणी अन्नविक्रीच्या आड मद्यविक्रीचाच मुख्य व्यवसाय फोफावत असल्याचे वास्तव आहे. नागरिकांच्या मते, याबाबत वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागांकडून केवळ कानाडोळा केला जात आहे. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.या पार्श्वभूमीवर, आंबेगाव तालुक्यातील पूर्व भागात सुरू असलेल्या बेकायदेशीर दारूविक्रीवर तात्काळ कठोर कारवाई करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे. आता तरी संबंधित अधिकारी झोपेतून जागे होऊन ठोस पावले उचलतील का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सिताफळ बहार व्यवस्थापनावर दिवे येथे मार्गदर्शन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**दिवे (ता. पुरंदर) :** पुरंदर तालुक्यातील प्रमुख पिक असलेल्या सिताफळाच्या उन्हाळी हंगामाच्या पार्श्वभूमीवर दिवे येथे सिताफळ बहार व्यवस्थापन, छाटणी, खते तसेच कीड–रोग नियंत्रण विषयक चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. हे चर्चासत्र सिताफळ उत्पादक बाळासाहेब टिळेकर यांच्या बागेत पार पडले.कार्यक्रमात तालुका कृषी अधिकारी पदाधिकारी श्रीधर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना बहार नियोजनाची माहिती देण्यात आली. जाधववाडी येथील सिताफळ संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ पदाधिकारी प्रदीप दळवे यांनी शास्त्रीय पद्धतीने छाटणी कशी करावी, तसेच रासायनिक व सेंद्रिय खतांचा रिंग पद्धतीने योग्य अंतरावर वापर कसा करावा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यानंतर कृषी तज्ज्ञ पदाधिकारी युवराज बालगुडे यांनी छाटणीनंतर बोर्डो मिश्रणाची फवारणी, फळ काळे पडू नयेत यासाठी घ्यावयाची काळजी, बुरशीनाशके व किटकनाशकांचा योग्य वापर तसेच टिमाँसक्युटो बग नियंत्रण यावर माहिती दिली. उपकृषी अधिकारी पदाधिकारी गणेश जगताप यांनी पिठ्या ढेकूण नियंत्रणासाठी झाडाच्या खोडाला उलट्या पद्धतीने चिकट पट्टी बांधण्याचा सल्ला दिला. कृषी सहायक पदाधिकारी कोंडिबा जरांडे व शुभांगी रासकर यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती देत तण नियंत्रणासाठी प्लास्टिक आच्छादन वापरण्याचा सल्ला दिला.

# बारामतीत संयुक्त जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रम

## समता व बंधुत्वाचा संदेश..

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** तथागत भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त बारामती येथे भव्य व उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. भाररत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त उत्सव समिती आणि संघर्षशक्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात स्नेहभोजन व भेटवस्तू वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. उपस्थित नागरिकांशी संवाद साधत समता, बंधुता आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते योगेंद्र पवार उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणून किरण इंगळे, राजेंद्र सोनवणे, नाना सातव, प्रतीक ढवाण पाटील, अभिजित घाडगे, विशाल हिंगणे, गणेश जोजारे, विशाल जाधव, चिऊशेठ जजिंरे, प्रताप पागळे, अनिता गायकवाड, सोमनाथ गजाकस, अजिज शेख, विपुल ढवाण पाटील, अक्षय शेरे, योगेश नालंदे, जमीर सय्यद, धनंजय जमदाडे, शुभम अहिवळे, गौरव अहिवळे, अमोल कुलट, निलेश साळुंखे, संभाजी माने, राजेश कांबळे, अजय लालबिगे, बाळासो गायकवाड, अतुल पवार, प्रतीक जोजारे आणि



कृष्णमूर्ती जगताप उपस्थित होते. यावेळी योगेश महाडीक, अॅड. चैतन्य गालिंदे, अस्लम तांबोळी, सोनू लोणकर, राहुल भापकर, योगेश महाडीक, महामुनी मामा, विनायक कांबळे गुरुजी, वसीम तांबोळी, रणजीत मोतीकर, समीर शहा, वसीम बागवान, अशपाक शेख, अकबर तांबोळी, अमीन अन्सारी, इम्तियाजभाई तांबोळी, जुनेद बागवान, रफिक शिकलकर, युसुफ तांबोळी यांच्यासह स्थानिक महिला व पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या कार्यक्रमातून सर्व समाजघटकांना एकत्र आणत समता, बंधुता आणि सामाजिक ऐक्याचा प्रभावी संदेश देण्यात आला. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने करण्यात आली.

# माहूर विद्यालयाचा ग्रामस्थांकडून नागरी सत्कार जिल्ह्यात द्वितीय, तालुक्यात प्रथम क्रमांक

## शैक्षणिक गुणवत्ता अभियानात उल्लेखनीय यश; सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत शिक्षकांचा गौरव

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नाझरे सुपे :** माहूर येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,



सासवड संचालित माहूर माध्यमिक विद्यालयाने सन २०२५–२०२६ च्या शैक्षणिक गुणवत्ता अभियानात जिल्हास्तरावर द्वितीय तर तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशानिमित्त ग्रामस्थांच्या वतीने विद्यालयाचा भव्य नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी माहूर गावचे इनामदार तथा माजी जिल्हा परिषद सदस्य बबुसाहेब माहूरकर, गावच्या प्रथम नागरिक पुनम तुषार माहूरकर, सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक तुषारशेठ माहूरकर, माजी सरपंच तुषार जगताप, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सोमनाथ जगताप, ग्रामसेवक शशांक सावंत, तलाठी स्विकार कुंभार, योगेश जगताप, सुशिल चव्हाण, राजाराम खोमणे तसेच संघर्ष प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमास ग्रामस्थ, पालक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समारंभात विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत पवार यांच्यासह इंद्रभान पठारे, लता गायकवाड, महेंद्र भोसले, रामप्रभू पेटकर, विकास राऊत, रामचंद्र जगताप, रामभाऊ कुंभार, श्रीकांत खोमणे, मंगल जगताप, जीवन कड आणि श्रीकांत गव्हाणे या सर्व शिक्षकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे सर्वांनी विशेष कौतुक केले. ग्रामस्थांनी आपल्या मनोगतात विद्यालयाच्या सातत्यपूर्ण प्रगतीबद्दल आनंद व्यक्त करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या यशामुळे संपूर्ण गावाचा अभिमान वाढला असल्याचे मतही अनेकांनी व्यक्त केले. मुख्याध्यापक हनुमंत पवार यांनी आपल्या भाषणात या यशाचे श्रेय शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांच्या एकत्रित प्रयत्नांना दिले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महेंद्र भोसले यांनी केले, तर आभार प्रदर्शन पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष रामप्रभू पेटकर यांनी मानले. या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यालय भविष्यातही अशीच उज्ज्वल कामगिरी करेल, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला.

> मशिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्या एकत्रित प्रयत्नामुळेच हे यश मिळाले आहे. भविष्यातही अशीच प्रगती कायम ठेवण्याचा आमचा प्रयत्न राहील.
>
> ‑ मुख्याध्यापक हनुमंत पवार

**बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या कसबा, बारामती**
**जि.पुणे फोन नं. ०२११२–२९९३७२, मो नं.९५४५४५००३५**
ई मेल. : **btd.pur@gmail.com**

**ई टेंडर नोटीस.**

आमच्या बारामती तालुका सहकारी दध उत्पादक संघाच्या नंदन पशुखाद्य कारखाणा व नंदन डेअरी विभागातील खालील तपशीलप्रमाणे बॉयलरचे मेन्टंन्स, क्लिनिगं व इन्सपेक्शन काम तेसेच स्किम्ड मिल्क पावडर खरेदी करावयाचे आहे. त्यासाठी ई. टेंडर मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचा तपशील | बयाणा रक्कम रु | कामाचा कालावधी | टेंडर फी (ना परतावा रक्कम) |
|---|---|---|---|---|
| १ | फोब्जें मार्शल मेक १.५ टनी बॉयलर नं. १४५९९/– चे वार्षिक तपासणीच्या अनुषगाने करावयाची मेन्टंन्स व क्लिनिगंची कामे | १०,०००/ | ३ दिवस | १,०००+ जी.एस.टी (१८%) |
| २ | २ टनी Combloc स्टीम बॉयलरचे वार्षिक क्लिनिगं व इन्सपेक्शन काम IBR Boiler Capacity 2 TPH | १०,०००/ | ३ दिवस | १,०००+ जी.एस.टी (१८%) |
| ३ | स्किम्ड मिल्क पावडर (१०,००० किलो) | १०,०००/ | – | १,०००+ जी.एस.टी (१८%) |

सदर निवेदेतील मालाचा तपशील, अनामत रक्कम, नियम अटी, शर्थी इत्यादी माहिती दि. ०५/०५/२०२६ सकाळी ११.०० पासून संघाच्या www.indiaengineering.com/baramatitender या वेबसाईटवरती गेल्यानंतर Currently Online Tenders ला क्लिक केल्यास पहावयास मिळतील. सदर ई टेडर प्रक्रिया अंतर्गत निविदा दि.०५/०५/२०२६ सकाळी ११.०० ते दि.१२/०५/२०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत ई टेडर पद्धतीने वेबसाईटवरूनच भरता येईल.

कोणतेही कारण न देता निविदा पूर्णतः किवा अंशतः मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. संचालक मंडळाने राखून ठेवला आहे.

**डॉ. योगेश वा.राणे** – व्यवस्थापकीय संचालक
**दतात्रय. सं. वावगे** – व्हा. चेअरमन
**संजय.रा. कोकरे** – चेअरमन
**बारामती तालुका सहकारी दुध उत्पादक संघ**

दखल

## उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण विभागाचा निकाल ९६.५०टक्के

**लिंपणगाव** : श्रीगोंदा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण विभागाचा (पूर्वीचे एम सी व्ही सी) बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत यावर्षी ९६.५५% निकाल लागला. या विभागांतर्गत इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी क्रॉप सायन्स आणि हॉर्टिकल्चर हे व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम शिकविले जातात.हे अभ्यासक्रम केंद्रशासन पुरस्कृत असून महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभागाच्या अंतर्गत राबविले जातात. या अभ्यासक्रमाचे दरवर्षी चांगले निकाल लागत असून विद्यार्थी गुणवत्ता यादीत देखील येतात. महाविद्यालयातील बारावी इलेक्ट्रॉनिक्स आणि बारावी हॉर्टिकल्चर या वर्गाचा यावर्षीचा निकाल १००टक्के लागला ही अभिनंदनीय बाब आहे. तर बारावी क्रॉप सायन्स वर्गाचा निकाल ९३.७५टक्के लागला.गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये याहीवर्षी मुलींनी आघाडी घेतली.या विभागात हॉर्टिकल्चर वर्गाची कु. निकिता भास्कर शिरसाट ही विद्यार्थिनी ७९ टक्के गुण मिळवून प्रथम आली, तर कु. अंकिता संतोष शेळके ही विद्यार्थिनी ७० टक्के गुण मिळवून दुसरी आली.क्रॉप सायन्स चा महेश रामदास रायकर हा विद्यार्थी ६८ टक्के गुण मिळवून विभागात तिसरा आला. सर्व यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.राजेंद्र दादा नागवडे, जिल्हा बँकेच्या संचालिका मा. अनुराधा ताई नागवडे, संस्थेचे इन्स्पेक्टर प्राचार्य सचिनराव लगड सर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, उपप्राचार्य प्रा. चंद्रभान कातोरे, व्यवसाय शिक्षण विभागाचे विभाग प्रमुख, माजी संचालक प्रा. सुनील माने, पर्यवेक्षक प्रा. प्रवीण टकले सर्व प्राध्यापक,पालक व परिसरातील शिक्षणप्रेमींनी अभिनंदन केले आहे.या विभागातील अभ्यासक्रमांना दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने प्रवेश घ्यावा असे आवाहन देखील महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.



## निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन साजरा

**ढोरजळगांव** : निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन व कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी संस्थेच्या शिक्षण विभाग प्रमुख श्रीमती वंदना पुजारी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. श्रीमती पुजारी बोलताना म्हणाल्या की कोणतेही काम लहान नसते, प्रत्येक काम समान दर्जाचे व महत्त्वाचे असते, असा मोलाचा संदेश दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व समजून घेण्याचे आवाहन करत महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छाही दिल्या. शाळेचे सहसमन्वयक ज्ञानेश्वर लबडे, शाळेचे प्राचार्य दत्तात्रय मोरे यांनीही महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे महत्त्व विषद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल पवार यांनी केले तर आभार श्रीमती रूपाली शेटे यांनी मानले. यावेळी शाळेत सुरू असलेल्या समर कॅम्प अंतर्गत विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमांना उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. समर कॅम्पमधील सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमास अकॅडमी कोऑर्डिनेटर बाळू निळ, बाळू कांबळे शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## कला शाखेच्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**ढोरजळगांव** : भातकुडगाव माध्य उच्च माध्य विद्यालयाचा इयत्ता १२ वी सन फेब्रु / मार्च २०२६ चा निकाल ७२ .२२ % लागला. त्यामध्ये प्रथम कु. उगलमुगले गीता सुभाष ७१.३३% टक्के व्दितीय कु.उगलमुगले पूजा सुभाष ६५.८३ टक्के, तृतीय कु. साळवे वैशाली काळू ६१.८३% चतुर्थ कु. फटांगरे साक्षी दत्तात्रय ६०.६७% गुण मिळवून या विद्यार्थीनींनी यशाची उज्वल परंपरा कायम ठेवली. यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापक यांचे संस्थेचे अध्यक्ष मा. आ. डॉ. नरेंद्र घुले पाटील , सचिव मा. आ. चंद्रशेखर घुले पाटील, जि. प. अध्यक्षा सौ राजश्रीताई घुले पाटील, सभापती डॉ. क्षितिज घुले पाटील, प्रशासकीय अधिकारी के. वाय. नजन, संस्था समन्वयक विजय काशिद तसेच विद्यालयाचे प्राचार्य सुरेश शेरे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व ग्रामस्थ यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व पालक यांचे अभिनंदन केले आहे.

# पैलवान माऊली कोकाटे कन्हैया केसरीचा मानकरी

## चांदीची गदा व ३ लाख ५१ हजार रुपये विजेता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : पुणे येथील हनुमान आखाड्याचा पैलवान व उपमहाराष्ट्र केसरी पैलवान माऊली कोकाटे हा कन्हैया केसरीचा मानकरी मानकरी ठरला असून चांदीची गदा व ३ लाख ५१ हजार रुपये जिंकत त्याने नामवंत अशा अजय बलवान याचा पराभव केला आहे. कन्हैया दूध उद्योग समूहाचे संस्थापक शांताराम मामा लंके यांच्या स्मरणार्थ निघोज येथे भव्य कुस्ती स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते.

विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या हस्ते पहिली कुस्ती लावून कुस्ती स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी राज्यातील पन्नास पेक्षा जास्त नामवंत पैलवानांनी सहभागी होऊन तब्बल १५ लाख रुपयांची बक्षिसे जिंकली आहेत. कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मच्छिंद्रशेठ लंके व त्यांच्या सहकाऱ्यांनी या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले होते. तब्बल चार एकर परिसरात कुस्तीसाठी मैदान तयार करण्यात आले होते. सायंकाळी सात ते रात्री दहा वाजेपर्यंत कुस्तीचा सिलसिला सुरू होता. यामध्ये पहिली ३ लाख ५१ हजार रुपये व चांदीची गदा मिळवण्याचा मान पुणे येथील हनुमान आखाड्याचा पैलवान उपमहाराष्ट्र केसरी माऊली कोकाटे याने मिळवला आहे. दुसऱ्या क्रमाकांची २ लाख ५१ हजार रुपयांची कुस्ती पुणे येथील शिवराम दादा तालीम मंडळाचा पैलवान सुदर्शन कोतकर व आर्मी सेंटर पुणे येथील पैलवान सुरज चौधरी यांच्यात झाली. यामध्ये सुदर्शन कोतकर हा पैलवान विजयी झाला. तिसरी कुस्ती १ लाख ५१ हजार रुपयांची झाली प्रमोद सुळ व बालाजी खरात यांच्यात झालेल्या या कुस्तीत शिवराम दादा तालीम मंडळाचा बालाजी खरात विजयी



झाला. या प्रमुख कुस्त्यांच्या अगोदर तब्बल सतरा ते अठरा कुस्त्या झाल्या. यामध्ये जवळपास सर्वच प्रमुख कुस्तीबरोबर ईतर कुस्त्या चितपट झाल्या. अतिशय थरारक झालेल्या या कुस्ती स्पर्धेत कुस्ती शौकीनांनी मोठ्या प्रमाणात उपस्थीती होती. प्रत्येक कुस्तीला प्रेक्षक दाद देत होते. बऱ्याच वर्षांनंतर पुणे अहिल्यानगर, मुंबई तसेच राज्यातील ईतर भागातील आलेल्या कुस्ती शौकीनांना रोमहर्षक कुस्त्या पाहावयास मिळाल्या.

या कुस्ती स्पर्धेचे उद्धाटन विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार शिवाजीराव शिर्के, राष्ट्रीय कुस्ती पंच भालेराव, प्रसिद्ध निवेदक युवराज केचे, कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मच्छिंद्रशेठ लंके, उद्योगपती सुभाष झिणे, आयोजक पैलवान अमोल लंके, सुरेशशेठ पठारे, अभयशेठ औटी, नितीनशेठ अडसूळ, विकास शेठ आढाव, बाबासाहेब चिडे,अरुणशेठ मुन्सी, सुनिती ज्वेलर्सचे मालक गणेशशेठ कटारिया, विकासशेठ सावंत, डी बी लाळगे कंट्रक्शन कंपनीचे संचालक सागरशेठ लाळगे आदी असंख्य मान्यवर तसेच कुस्ती शौकीन व पारनेर,शिरुर तालुक्यातील जनता बहुसंख्येने उपस्थित होते.

विधानपरिषदेचे सभापती प्रा राम शिंदे यावेळी म्हणाले ग्रामीण भागात शेतीचा विकास करताना कन्हैया दूध उद्योग समूहाचे संस्थापक शांताराम मामा लंके यांनी मोठ्या प्रमाणात उद्योग विश्व निर्माण केले.

कन्हैयाचा नावलौकिक जगात झाला आहे. युवा उद्योजक म्हणून काम करताना कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मच्छिंद्रशेठ लंके यांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूधाला भाव मिळवून देत दूधापासून विविध पदार्थ तयार केले.

त्याचा नावलौकिक जगात झाला आहे. निघोज सारख्या ग्रामीण भागात उद्योग विश्व निर्माण करण्याची जबाबदारी मच्छिंद्रशेठ लंके यांनी यशस्वीपणे पार पाडली आहे. कन्हैया माध्यमातून शांताराम मामा लंके यांच्या स्मरणार्थ या कुस्ती स्पर्धा घेऊन कुस्ती स्पर्धेला राजाश्रय देण्याचे काम मच्छिंद्रशेठ लंके यांनी केले असल्याचे गौरवोद्गार सभापती शिंदे यांनी व्यक्त केले आहे.

## माध्यमिक विद्यालयाची उज्ज्वल निकालाची परंपरा कायम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे पारनेर तालुक्यातील निघोज येथील श्री मुलिकादेवी माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालयाचा एच.एस.सी. परीक्षा २०२६ विज्ञान शाखेचा निकाल -९६.७९ टक्के लागला आहे. या परीक्षेला एकूण १८७ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १८१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. दोन विद्यार्थी गैरहजर होते. तर चार विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. त्यामुळे विद्यालयाचा निकाल ९६. ७९ टक्के लागला आहे.

या परीक्षेत विद्यालयातील गुणानुक्रमे प्रथम पाच विद्यार्थी: शिवराज सुनील कदम-८६.५०%, कु. सृष्टी सतीश खोसे-८२.३३%, शिवराज सुनील तांबे - ७०.५०%, कु. प्राची राजेश लाळगे -६९.१७%, ऋतुजा हिरामण जाधव-६३.६७% असे आहेत तसेच कला शाखेचा निकाल ७९.३३% लागला असून या परीक्षेला ३१ विद्यार्थी बसले होते त्यापैकी २३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले



दोन विद्यार्थी गैरहजर होते तर सहा विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले त्यामुळे कला शाखेचा निकाल १९.३१% लागला आहे या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम पाच विद्यार्थी: कु. आकांक्षा सुनील गाजरे - ८२.००%, कु. मोक्षदा सुनील व्यवहारे - ६२.३३%, कु. सृष्टी संतोष जावळे - ६२.३३%, आरती चरपटी दिवसे - ६१.३३%, वैभव कृष्णा वारे - ५८.००%, कु. तेजस्विनी लहू निचित-५७.३३% यांचा समावेश आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष रा.ह.दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव डा. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव. मुकेश मुळे, खजिनदार ड.श्रीम दीपलक्ष्मी म्हसे मॅडम,जेष्ठ विश्वस्त.

नंदकुमार झावरे, जेष्ठ विश्वस्त. सिताराम खिलारी सर तसेच सर्व विश्वस्त व सदस्य यांनी विद्यार्थी, पालक व मार्गदर्शक शिक्षक यांचे अभिनंदन केले.

तसेच विद्यालयाचे प्राचार्य अंकुश अवघडे सर, उपप्राचार्य. कैलास मोकळे सर, पर्यवेक्षक लक्ष्मण झंजाड सर, समन्वयक किरण पाडळकर,सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,

शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य व ग्रामस्थ यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.या विद्यार्थ्यांना दारकू खोडदे, तुळसा तांबे, किरण पाडळकर, राजेंद्र भगत, अमोल खिलारी, लालासाहेब अनारसे, रंजना दाते, बाबाजी लाळगे, प्रविण काळे, भाऊसाहेब शिंदे, चंद्रभान ठुबे, संदिप देवढे, दिपक कर्पे, सुरेखा गोरडे, निलम शिकारे, योगेश कवळे यांचे मार्गदर्शन लाभले.

## काकडे कनिष्ठ महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाने इयत्ता बारावी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी /मार्च २०२६ चा ऑनलाईन निकाल जाहीर केला .यामध्ये कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे आबासाहेब काकडे कनिष्ठ महाविद्यालय शेवगाव येथील विद्यार्थ्यांनी उज्वल यश मिळवले.

कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील प्रथम तीन आलेल्या विद्यार्थ्यांचा पालकांसमवेत कनिष्ठ महाविद्यालयाकडून यथोचित सत्कार करण्यात आला. कला शाखेमध्ये साक्षी मच्छिंद्र निकम या विद्यार्थिनीने ८६.६७ %गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला.साक्षी दीपक मगर ८२.३३ % गुण मिळवून द्वितीय तर खणक भरत गुप्ता ७८% टक्के गुण मिळवून तृतीय आली. विज्ञान शाखेमध्ये सिद्धी भीवसेन उंदरे हिने ७८.५० %गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला तर अनुष्का संदीप चव्हाण हिणे ७४.३३ % गुण मिळवून द्वितीय व संग्राम आरूण काळे याने ७३. ३३ % गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. वाणिज्य शाखेमध्ये कु .श्रद्धा शांताराम जाधव हिने ८७. ६७ % गुण मिळवत प्रथम क्रमांक प्राप्त केला गौरव पंढरीनाथ पल्हारे याने ७०.१७ टक्के गुण मिळवून द्वितीय तर वैष्णवी आबासाहेब साबळे हिणे ६७% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. कला शाखेचा शेकडा निकाल ५६.१६%, विज्ञान शाखेचा ९१ .१६ % तर इंग्लिश मीडियम वाणिज्य शाखेचा निकाल ५३ .३३ % लागला .कनिष्ठ महाविद्यालयाचा सरासरी निकाल ७४.६२ % इतका आहे.

## उंडेमळा शाळेतील विविध उपक्रम कौतुकास्पद : गटविकास अधिकारी तोटेवाड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव** : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उंडेमळा शाळेत राबविले जात असलेले हस्ताक्षर सुधार, अप्रगत विद्यार्थ्यांसाठी झटपट वाचन प्रकल्प, कुशाग्र विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, तज्ज्ञांचे व्याख्यान, शिवजयंती उत्सव, किल्ले बनवा स्पर्धा, मिशन आपुलकी अंतर्गत लोकसहभागातून शाळेचा विकास, शालेय व्यवस्थापन समित्तीचा सक्रिय सहभाग आदि उपक्रम कौतुकास्पद आहे.इतर शाळांनी त्यांचा आदर्श घ्यावा असे प्रतिपादन वसमत जिल्हा हिंगोली चे गटविकास अधिकारी प्रफुल्ल तोटेवाड यांनी केले.

मुख्यमंत्री समृद्ध ग्राम पंचायतराज अभियान तपासणी समितीने मढेवडगाव येथील उंडेमळा जि प शाळेस भेट दिली. त्यावेळी त्यांनी कौतुक केले. शाळेतील सीसीटीव्ही कॅमेरे, स्वच्छता संकुल, वॉटर फिल्टर सुविधा, डिजीटल शिक्षण, स्वच्छ सुंदर परिसर, शालेय रेकॉर्ड, पालकांच्या गुपवरील विद्यार्थ्यांचा दैनंदिन अभ्यास या बाबींची त्यांनी पाहणी करून समाधान व्यक्त केले. मढेवडगाव ग्रामपंचायतीसही त्यांनी भेट देऊन विकासकामांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. यावेळी सहाय्यक गटविकास अधिकारी एम. पी . पाटील,विस्तार अधिकारी आदिनाथ पांचाळ, बाळासाहेब कदम, काकासाहेब खोसे, एम. ए वाघ, सारिका हराळ, डी. ए. मांढरे, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी शालन थोरात, पर्यवेक्षिका पूजा पाडळे, ग्रामपंचायत अधिकारी दिनेश अलगुंडे, रामप्रसाद काळे, संगणक ऑपरेटर ज्ञानेश्वर डोके तसेच लोकनियुक्त सरपंच प्रमोद शिंदे, उपसरपंच सुनिता उंडे, मा. उपसरपंच अमोल गाढवे, ग्रा पं सदस्य योगेश शिंदे,सचिन उंडे शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा श्रद्धा गायकवाड, अशोक शिंदे, सुलोचना मांडे, इंजि. लालचंद गोरे, आदि उपस्थित होते.

## मढेवडगावची विकासाच्या दिशेने झेप: एकजुटीच्या बळावर उभा राहिलेलं विकासाचं आदर्श मॉडेल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : गाव करील ते राव काय करील या उक्तीचा प्रत्यय देत मढेवडगाव ग्रामपंचायतीने विकासाची उल्लेखनीय वाटचाल करत एक आदर्श उभा केला आहे. मुख्यमंत्री समृद्धी ग्राम योजनेच्या अनुषंगाने मान्यवर अधिकाऱ्यांनी गावाला भेट देत सखोल पाहणी केली असता, गावातील सर्वांगीण विकास, स्वच्छता, नियोजनबद्ध कामकाज आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग पाहून समाधान व्यक्त करत कौतुकाचा वर्षाव केला.

यावेळी मुख्यमंत्री ग्राम समृद्धी योजनेसाठी महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेले. गटविकास अधिकारी तोटेवाड, विस्तार अधिकारी बाळासाहेब कदम, आदिनाथ पांचाळ विस्तार अधिकारी अनिल पांढरे, ग्रामपंचायत अधिकारी दिनेश अलगुंडे, रामप्रसाद काळे, तसेच संगणक ऑपरेटर ज्ञानेश्वर डोंगे यांनी गावातील विविध विकासकामांची पाहणी करून गावाच्या प्रगतीचे मनापासून अभिनंदन केले. यावेळी टीम अधिकारी एस. ए. वाघ, सारिकाताई



हराळ मॅडम यांची उपस्थिती लाभली.

या यशामागे विद्यमान लोकनियुक्त सरपंच प्रमोदजी शिंदे, उपसरपंच सुनीताताई उंडे, मढेवडगाव ग्रामपंचायतचे कर्तव्यदक्ष ग्राम विकास अधिकारी खाडे भाऊसाहेब, सर्व सन्माननीय सदस्य, प्रामाणिक कर्मचारी वृंद आणि जागरूक ग्रामस्थ यांची एकजूट, प्रामाणिक प्रयत्न आणि गावाच्या विकासाविषयीची तळमळ ठळकपणे दिसून आली. आपले गाव आपली जबाबदारी या भावनेतून प्रत्येकाने उचललेले पाऊल आज मढेवडगावला आदर्श गावाच्या दिशेने घेऊन जात आहे.

मुख्यमंत्री ग्राम समृद्धी योजनेसाठी महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या अधिकाऱ्यांनीही गौरवोद्गार काढले. मढेवडगाव हे केवळ योजनांची अंमलबजावणी करणारे गाव नसून, लोकसहभाग, पारदर्शकता आणि प्रामाणिक नेतृत्व यांचे जिवंत उदाहरण आहे.

आज मढेवडगावची ही प्रगती केवळ आकडेवारीपुरती मर्यादित नसून, ती प्रत्येक ग्रामस्थाच्या कष्टाची, स्वप्नांची आणि एकजुटीची साक्ष देणारी आहे.

या प्रेरणादायी प्रवासातून इतर गावांसाठीही नवा आदर्श निर्माण होत असून, मढेवडगावची वाटचाल आता समतेची भूमी आणि प्रेरणेचा दीपस्तंभ ठरत आहे.

# कनगरला ना. आठवले यांचा नागरी सत्कार

## मिरजगावात ७ मे रोजी नियोजन बैठक : साळवे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री यांची तिसऱ्यांदा राज्यसभेवर निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सत्कार सोहळा कनगर (ता. राहुरी) येथे १४ मे रोजी सायंकाळी ठीक ७ वाजता संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर दक्षिण जिल्ह्याच्या नियोजनासाठी महत्त्वपूर्ण बैठक गुरुवार, ७ मे रोजी मिरजगाव (ता. कर्जत) येथे दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आली आहे. दक्षिण जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे यांनी ही माहिती दिली.



या बैठकीला दक्षिण विभागातील सर्व तालुका अध्यक्ष, तालुका कार्यकारिणी सदस्य आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

मिरजगाव येथील हॉटेल शिवममध्ये होणाऱ्या या बैठकीत सत्कार सोहळ्याच्या नियोजनाचा आढावा घेऊन विविध जबाबदाऱ्या निश्चित केल्या जाणार आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आवश्यक नियोजन, कार्यकर्त्यांची भूमिका, तसेच जनसंपर्क मोहीम यावर सविस्तर चर्चा होणार.

या बैठकीसाठी पक्षाचे संपर्कप्रमुख तथा राज्य उपाध्यक्ष श्रीकांत भालेराव, राज्य उपाध्यक्ष विजयराव वाकचौरे, उत्तर महाराष्ट्राचे नेते राजाभाऊ कापसे, विभागीय अध्यक्ष भीमा बागुल, उत्तर जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, नगर शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, जिल्हा कार्याध्यक्ष लॉरेन्स स्वामी, जिल्हा सरचिटणीस विजय भांबळ यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

तसेच जिल्हा नेते अजय साळवे, गणेश कदम, अंकुश भैलुमे, रवींद्र दामोदरे, संजय भैलुमे, दत्ता कदम, जिल्हा उपाध्यक्ष विशाल काकडे, कुंडलिक गंगावणे, अमोल देवळेकर, सतीश भैलुमे, अविनाश भोसले, बाळासाहेब शिंदे, राजा जगताप, राजू उबाळे, बाबा राजगुरू, सतीश मगर यांच्यासह जिल्ह्यातील अनेक प्रमुख कार्यकर्ते या बैठकीत सहभागी होणार आहेत.

राहुरी येथे होणाऱ्या नागरी सत्कार सोहळ्याला मोठ्या प्रमाणावर जनसमुदाय उपस्थित राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत असून, या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पक्षाने जोरदार तयारी सुरू केली आहे.

## बारावी परीक्षेत जिया अमजद पठाण कर्जत तालुक्यात प्रथम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कर्जत** : कर्जत तालुक्याचा यंदा बारावीचा निकाल लागला असून यात बहुतांश ठिकाणी मुलींनी चांगली बाजी मारली. विज्ञान शाखेची समर्थ विद्यालयाची जिया अमजद पठाण या विद्यार्थीनीने तालुक्यात प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. तिने ९०.५ टक्के गुण मिळवले. तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. शनिवारी बारावी परीक्षेचा निकाल लागला. यात विविध शैक्षणिक संस्थांनी आपला निकाल चांगला राखला. कर्जत तालुक्यातील शाखानिहाय प्रथम तीन क्रमांक पटकावणारे विद्यार्थी पुढीलप्रमाणे : विज्ञान शाखा - जिया अमजद पठाण (९०.५), साक्षी नितीन धनवे ( ८७.८), श्लोक किशोर सांगळे (८७.६७). कला शाखा - वैष्णवी अनिल मासाळ (८६.८३), संस्कृती रघुनाथ बनकर (८५), स्वप्नील गजानन जाधव ( ८४.३३) आणि वाणिज्य शाखा - त्रिवेणी संतोष कानगुडे ( ८७.५), शुभम नामदेव गवळी (८०), वैष्णवी भाऊसाहेब वांगडे (७७.१७) या विद्यार्थ्यांनी टक्केवारी मिळवत तालुक्यातून प्रथम येण्याचा मान मिळवला. यंदाची परीक्षा ही कॉपीमुक्त आणि सीसीटीव्हीच्या निगराणी खाली पार पडली होती. यामुळे परीक्षेत कोणताही गैरप्रकार झाला नाही. हुशार आणि गुणवंत विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक निकाल लागला.

दैनिक राष्ट्र सह्याद्री

# श्रीरामपूरात आत्महत्या; अल्पवयीन मुलीसह प्रियकराने रेल्वेखाली जीवन संपवले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरात असणाऱ्या एमआयडीसी शिवारातील रेल्वे ट्रॅकवर एका १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलीसह तिचा २६ वर्षांच्या प्रियकराने रेल्वेखाली आत्महत्या करण्याची खळबळजनक घटना रविवारी रात्री घडली आहे. एमआयडीसीजवळ असलेल्या यादवबाबा मंदिराजवळील रेल्वे ट्रॅकवर एक स्त्री व एक पुरूष जातीचे मृतदेह छिन्नविछिन्न अवस्थेत मिळून आले. त्यानंतर याठिकाणी पोलिसांनी पंचनामा केला. याबाबत पोलिसानी केलेल्या तपासामध्ये समजलेल्या अधिक माहिती अशी की, सदरचे १७ वर्षांची तरूणी ही श्रीरामपूर शहरात मध्यवस्तीत राहते. सदर मुलगी हिचे सहा महिन्यांपासून २६ वर्षीय संजयनगर परिसरातील एका तरूणाबरोबर प्रेमसंबंध होते. महिनाभरापूर्वी या मुलीच्या घरच्यांना तिच्याकडे मोबाईल फोन आढळून आला होता. त्यातून मुलीचे प्रेमसंबंध असल्याची माहिती घरच्यांना समजली. तेव्हा त्यांनी मुलीकडून मोबाईल फोन काढून घेतला, आणि तिला, नाशिक जिल्ह्यात नातेवाईकांकडे पाठवले होते. तेव्हापासून मुलगी नाशिक जिल्ह्यात होती. सध्या ८ दिवसांपूर्वीच सदरची मुलगी ही नाशिक येथून श्रीरामपूरला आली. शनिवार (दि.२) मे रोजी घरच्यांना पुन्हा या मुलीकडे मोबाईल फोन आढळून आला. त्यामुळे तिचे वडिल तिच्यावर प्रचंड रागविले होते. त्यांनी रागारागात तिच्याकडून मोबाईल फोन काढून घेतला. तेव्हा मुलगी रागातच घरातून निघून गेली. त्याचवेळी संजयनगर परिसरात राहणारा २६ वर्षीय तरूणही आपल्या घरातून निघून गेला होता.या दोघांच्याही घरचे त्यांना शोधत होते. त्यानंतर रविवारी रात्री या दोघांचे मृतदेह रेल्वे ट्रॅकवर छिन्नविछिन्न अवस्थेत आढळून आले. याबाबत दोघानी आत्महत्या केल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.



# डॉक्टरांनी 'शाश्वत' सेवा देऊन वैद्यकीय क्षेत्रातील विश्वासार्हता वाढवावी : ना.विखे

## शाश्वत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचा लोकार्पण सोहळा संपन्न





**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : तज्ज्ञ डॉक्टरांनी एकत्रित येत शाश्वत मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलची उभारणी करून आरोग्य सेवेचा नवा अध्याय सुरू केला आहे. सर्व प्रकारच्या वैद्यकीय सुविधा एकाच छताखाली उपलब्ध होणार असल्याने रुग्णांसाठी हे हॉस्पिटल वरदान ठरेल. वैद्यकीय क्षेत्र खूप व्यापक आहे. रुग्णांना माफक दरात त्यांनी वैद्यकीय सेवा उपलब्ध करून द्यावी. डॉक्टरांनी 'शाश्वत' सेवा देऊन वैद्यकीय क्षेत्रातील विश्वासार्हता वाढविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

महाराष्ट्र दिनी नगर-मनमाड रोडवरील शाश्वत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते व आमदार संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, 'मॅककेअर'चे डॉ. सतीश सोनवणे, 'आयएमए'चे अध्यक्ष डॉ. सी. डी. मिश्रा, होमिओपॅथी असो. चे अध्यक्ष डॉ. रणजित सत्रे, भाजपा जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक बाबासाहेब वाकळे, अजिंक्य बोरकर, सागर मुर्तडकर, करण नवले, ऋग्वेद गंधे, सुरेश बनसोडे, यांच्यासह हॉस्पिटलचे संचालक डॉ. दीपक कळमकर, डॉ. प्रदीप कंठाळी, डॉ. आकाश बेरड, डॉ. विश्वजीत पवार, डॉ. योगिता दरेकर-पवार, डॉ. अपूर्वा माटे-कळमकर, डॉ. तेजल सागडे-कंठाळी, डॉ. प्रतीक्षा सोळंके-बेरड, डॉ. दीपक गाडेकर, डॉ. दामोधर कळमकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार संग्राम जगताप म्हणाले की, शाश्वत मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलच्या रूपाने नगरच्या वैभवात आणखी भर पडणार आहे. रुग्णांना अद्ययावत वैद्यकीय सेवा सुविधांसाठी पुणे, मुंबईला जाण्याची गरज भासणार नाही. रुग्णांना परवडतील अशा दरात हॉस्पिटलने विविध सेवा उपलब्ध करून द्याव्यात.

बहुतांश डॉक्टर्स ग्रामीण भागातील असल्याने त्यांना समाजाची विशेष जाणीव आहे. ते हॉस्पिटलच्या माध्यमातून रुग्णांना अधिकाधिक चांगली सेवा उपलब्ध करून देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संचालक डॉक्टरांनी मनोगत व्यक्त करताना समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत उच्च दर्जाची, तज्ज्ञ व विश्वासार्ह वैद्यकीय सेवा पोहोचविण्याचा मानस व्यक्त करून अस्थिरोग, मेडिसिन, सर्जरी, किडनी विकार, स्त्रीरोग आदी आरोग्य सेवा हॉस्पिटलच्या वतीने उपलब्ध असल्याचे सांगितले.

पाहुण्यांचे स्वागत डॉ. दीपक कळमकर यांनी केले. प्रास्ताविकात डॉ. प्रदीप कंठाळी व डॉ. आकाश बेरड यांनी हॉस्पिटलच्या वतीने दिल्या जाणाऱ्या सेवासुविधांची माहिती दिली, तसेच आधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांची टीम, सर्वसमावेशक वैद्यकीय सुविधा, रुग्णकेंद्रीत सेवा, अतिदक्षता विभाग, मेडिकल व म्ब्युलन्स सेवा ही हॉस्पिटलची वैशिष्टये असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र टाक यांनी केले, तर डॉ. योगिता दरेकर-पवार यांनी आभार मानले.

# ते घड्याळ पंधरा दिवसात फिरणार

## पालिकेचे आश्वासन; तुर्तास आंदोलन स्थगित



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : नेहरु भाजी मार्केट येथील टॉवरवरील घड्याळ दुरुस्तीसाठी काल सोमवारी दि. ४, मे २०२६ रोजी भाजपचे संजय छल्लारे यांच्या नेतृत्वाखाली श्रीरामपूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांच्या दालनात आंदोलन करण्यात आले. यावेळी,नगरसेवक आशिष धनवटे, दिपक चव्हाण,रवी पाटील, श्रीनिवास बिहाणी, बंडू शिंदे, सिद्धार्थ फंड, मनोज लबडे, रवींद्र गुलाटी,राजेश अलघ, दीपक चव्हाण, मनोज लबडे, विशाल आंभोरे, विजय आखाडे, भैय्या भिसे, रुपेश हरकल, सिद्धार्थ छल्लारे, उमेश छल्लारे, तेजस उंडे, रवि पंडित, मिलिंद धिवर, राहुल मांढरे, संजय साळवे, रोहित नाईक, अमन अलघ, प्रवीण डेंगळे आदीसह पदाधिकारी उपस्थित होते. श्रीरामपूर शहरात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारण्यात आले. त्यांच्या स्मारकासमोरच असलेले हे घड्याळ बंद पडले.

हिंदू समाजात बंद पडलेले घड्याळ हे अपशकुन मानले जाते. म्हणजे आता हे घड्याळ शहराच्या विकासासाठी अपशकुन ठरणार का? असा प्रश्न पडला आहे, असे माजी उपनगराध्यक्ष संजय छल्लारे म्हणाले.

यावेळी, माजी उपनगराध्यक्ष रवींद्र गुलाटी म्हणाले, की आज घड्याळासाठी आम्ही आंदोलन करत आहोत, हीच सुरवात आहे, यापुढे शहराच्या जनतेच्या विविध भागांतील अनेक प्रश्नांसाठी आम्ही आवाज उठवत मोठी आंदोलने करणार आहोत, यांची सत्ताधाऱ्यांनी व पालिकेने सवय करून घ्यावी.यावेळी आशिष धनवटे, रुपेश हरकल, तिलक डुंगरवाल यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी आशिष धनवटे, रुपेश हरकल, तिलक डुंगरवाल यांनी मनोगत व्यक्त केले. या आंदोलनात तेजस बोरावके, भैय्या भिसे, संजय साळवे, विजय आखाडे, रवि पंडित, विशाल आंभोरे, बंडूकुमार शिंदे, तिलक डुंगरवाल, रियाज पोपटिया, मिलिंद धीवर, सिद्धांत छल्लारे, राहुल पांढरे, दिपक कदम, सुजीत सुखदरे, विकास डेंगळे, कुंदनसिंह जुनी, अमन अलघ, शरद गवारे, विशाल पापडीवाल, अकिल पठाण, रोहित नाईक, उमेश छल्लारे, दत्ता करडे, रवि पंडित, विशाल आंभोरे, तेजस उंडे, गणेश छल्लारे, गोपाल अहिरराव, शिवा छल्लारे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले.

# श्रीरामपूरात भाजपाच्यावतीने विजयांचा जल्लोष

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

श्रीरामपूर : देशात पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत पश्चिम बंगाल,आसाम,पांडूचेरी,राहुरी येथे विधानसभेच्या विजयाचा जल्लोष श्रीरामपूर भारतीय जनता पार्टीच्यावतीने साजरा करण्यात आला.पश्चिम बंगाल येथील मतदारांनी नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व स्वीकारून पश्चिम बंगालामध्ये भाजप बहुमताने विजय संपादन केला.

त्यानिमित्ताने नामदार राधाकृष्ण विखे पाटील, युवा नेता सुजय विखे पाटील जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर जिल्हा उपाध्यक्ष दिपक पटारे भाजपा नेते संजय फंड यांच्या मार्गदर्शनाखालील श्रीरामपुरात ढोल ताशा वाजून फटाके फोडून जल्लोष साजरा केला.

यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड,गटनेत्या वैशालीताई चव्हाण, नगरसेवक आशिष धनवटे, दीपक चव्हाण, संजय गांगड,श्रीनिवास बिहाणी, संजय छल्लारे, रवी गुलाटी, राजेश अलघ, विशाल अंभोरे, विजय आखाडे, मारुती बिंगले, बंडुकुमार शिंदे,रामभाऊ तरस, असिफभाई पोपटीया, ॲड. दीपक बाराहाते, सुबोध शेवतेकर, रोहन डावखर, अमन अलघ,भैरव कांगुणे,प्रताप पटारे,शंकर चव्हाण, रुपेश हरकल, योगेश ओझा, राहुल सराफ, मिलिंद साळवे, साजिद शेख, बाळासाहेब हरदास, प्रशांत शितोळे, जसपालसिह सहानी, सुनील हिवराळे, संजय साळवे, श्रीपाद लावर, प्रतीक वैद्य, रवी पंडित, पंकज ललवणी, पुजाताई चव्हाण, कविताताई दुबे, अनिताताई शर्मा,मनीष कुलकर्णी, सौरभ फुणगे,तेजस उंडे आदी भारतीय जनता पार्टी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुणवत्तेमुळे 'राजहंस'चा ब्रँड नावाजलेला

## राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची राजहंस दूध संघाला भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : दूध व्यवसायाने शेतकऱ्यांना मोठी मदत केली आहे. दूध उत्पादनामध्ये भारत हा जगात प्रथम क्रमांकाचा देश असून महाराष्ट्रात देशामध्ये सहाव्या क्रमांकाने दूध उत्पादन होते. दूध विक्रीला झोनबंदी नसून विश्वास आणि गुणवत्तेमुळे राजहंस हा ब्रँड झाला असल्याचे गौरवउद्गार राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी काढले आहे. संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघाला त्यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा दूध संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी समवेत दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख, व्हा.चेअरमन राजेंद्र चकोर, बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी, शेतकी संघाचे चेअरमन संपतराव डोंगरे,संचालक संतोष मांडेकर, विलास कवडे,विक्रम थोरात, बादशहा वाळुंज, संजय पोकळे, बबनराव कुऱ्हाडे, विष्णू ढोले, तुकाराम दातीर, रवींद्र रोहम, डॉ.प्रमोद पावसे, सौ. मंदा नवले,कार्यकारी संचालक डॉ. सुजित खिलारी यांच्यासह अमृत उद्योग समूहातील विविध पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना ज्येष्ठ नेते हरिभाऊ बागडे म्हणाले की, मी शाळा सोडल्यानंतर दूध व्यवसाय सुरू केला आणि त्या माध्यमातून सुरुवातीला संगमनेरला येण्याचा योग आला.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांची शिस्त ही सर्वांना दिशादर्शक ठरली. या परिसरात



लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली हा समृद्ध सहकार उभा राहिला आहे. दूध व्यवसायात देश जगामध्ये प्रथम क्रमांकाचा आहे. उत्पादन आणि विक्री आपल्याकडे चांगली आहे. उत्तर प्रदेश, राजस्थान पाठोपाठ महाराष्ट्राचा दूध उत्पादनात सहावा क्रमांक आहे.

या व्यवसायामुळे शेतकऱ्याला मोठी समृद्धी मिळाली आहे. राजहंस दूध संघाने विश्वास प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेमुळे आपला स्वतःचा ब्रँड निर्माण केला आहे. दूध विक्रीला झोनबंदी नसल्याने तुम्हाला मोठी संधी आहे. खाजगीकरणाची स्पर्धा आहे. परंतु सहकार हा सर्वसामान्यांच्या विकासासाठी असतो म्हणून सहकार जपला पाहिजे. आज सहकारी दूध संघांमधून पस्तीस टक्के तर खाजगी मधून ६५ टक्के दूध संकलन होत आहे. सहकारी संघांमधून होणाऱ्या राज्याच्या संकलनामध्ये राजहंस दूध संघाचाच ६५ टक्के वाटा आहे असे सांगताना रणजीतसिंह देशमुख हे शांत स्वभावाचे असून सर्वांना सोबत घेऊन पुढे जाणारे आहेत.

त्यांनी एमडीएम गोठा, मुरघास याचबरोबर आता नव्याने मिशन ५० लिटर हाती घेतले आहे. दूध क्षेत्रामध्ये निर्माण केलेले हे नवे दालन महाराष्ट्रासाठी नक्कीच मार्गदर्शक ठरणारे असल्याचे ते म्हणाले. तर रणजीतसिंह देशमुख म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी स्थापन केलेल्या दूध संघाची ४०० लिटर पासून सुरू झालेली वाटचाल आता ४ लाखापर्यंत येत आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली दूध संघाने कायम शेतकरी केंद्रबिंदू मानून त्याच्या आर्थिक विकासासाठी काम केले आहे. गुणवत्ता आणि उच्च प्रतीचे दूध असल्यामुळे कर्नाटक, महाराष्ट्र आणि गुजरात मध्ये मोठी विक्री आहे.

सुमारे ५५० कोटींची दूध संघाची आर्थिक उलाढाल होत असून चांगल्या दराबरोबर दिवाळीला रिबेटच्या रूपाने शेतकऱ्यांना मोठी मदत केली जात असल्याचे ते म्हणाले. याचबरोबर हरिभाऊ बागडे यांनी दूध व्यवसायामध्ये मोठे काम केले असून महानंदामध्ये आपल्याला कायम मार्गदर्शन केले असल्याचे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.सुजित खिलारे यांनी केले तर व्हा. चेअरमन राजेंद्र चकोर यांनी आभार मानले.

### लोकनेते बाळासाहेब थोरात हे चांगले व्यक्तिमत्व

१९८५ ला बाळासाहेब थोरात आणि मी सोबतच विधानसभेमध्ये गेलो. आमचे विचार वेगळे, मात्र मैत्री कायम राहिली. अत्यंत सरळ, सुस्वाभावी आणि शांत असणारे बाळासाहेब थोरात यांनी कायम सर्वांना सोबत घेऊन काम केले. कधीही भेदभाव केला नाही. सततच्या विकास कामांमधून तालुक्यामध्ये आणि या परिसरामध्ये समृद्धी निर्माण केली असल्याचे गौरवउद्गार राज्यपाल डॉ.हरिभाऊ बागडे यांनी काढले.

# 'आमच्या मुलासाठी मुलगी मिळेल का?'

## लग्नाळू तरुणांच्या पालकांची वाढती चिंता

**भरत थोरात | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : काही वर्षांपूर्वी लग्नासाठी 'मुलगा पाहण्याची' पद्धत होती, मात्र आज काळ इतका बदलला आहे की, लग्नासाठी 'मुलगी' शोधताना पालकांची दमछाक होत आहे. श्रीरामपूरसह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात सध्या 'मुलींची घटलेली संख्या' आणि 'वाढत्या अपेक्षा' या दुहेरी संकटाने लग्नाळू तरुणांच्या पालकांची झोप उडवली आहे. आज ३० ते ३५ वयोगटातील हजारो तरुण आयुष्यभराच्या जोडीदाराच्या प्रतीक्षेत आहेत. गेल्या काही वर्षांत लिंग गुणोत्तरात झालेली घट आणि मुलींचे उच्चशिक्षण यामुळे सामाजिक चित्र पूर्णपणे बदलले आहे.

एकेकाळी मुलींच्या लग्नाची चिंता सतावणारे पालक आता मुलांच्या लग्नासाठी वणवण फिरताना दिसतात. मुलगा काय करतो?, पुणे-मुंबईत नोकरी आहे का?, एकुलता एक आहे का? आणि शेतकरी नको, अशा प्रश्नांच्या जाळ्यात सामान्य कुटुंबातील तरुण अडकले आहेत. मुली आता सुशिक्षित आणि स्वावलंबी आहेत. साहजिकच त्यांनी आपल्या सहजीवनाच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. मात्र, या प्रक्रियेत केवळ नोकरी आणि शहरातले राहणीमान यालाच प्राधान्य मिळत असल्याने ग्रामीण भागातील आणि शेतीवर अवलंबून असलेल्या मुलांची मोठी कोंडी झाली आहे.

दुर्दैवाची बाब म्हणजे, आज शेती करणाऱ्या तरुणांना 'पगाराची नोकरी' नसल्याच्या कारणास्तव नाकारले जात आहे. ज्या समाजाने एकेकाळी शेतीला प्रतिष्ठा दिली, तिथेच आता 'शेतकरी नको' अशी मानसिकताच लग्नासाठी मोठा अडसर ठरत आहे.

वधुवर केंद्रांमध्ये मुलांच्या बायोडाटाची मोठी रांग लागली आहे, पण सोयरीक जुळण्याचे प्रमाण नगण्य आहे. सततचे नकार आणि उशिरा होणारी लग्ने यामुळे तरुणांचे मानसिक आरोग्य ढासळत आहे. काही तरुण नैराश्यातून चुकीची पावले उचलत आहेत, ही बाब अधिकच गंभीर आहे. केवळ नोकरी किंवा पगाराच्या निकषावर लग्न ठरवणे ही प्रवृत्ती समाजात वाढली आहे. आता गरज आहे ती केवळ वर-वधूच्या आर्थिक परिस्थितीकडे न पाहता, एकमेकांचा स्वभाव आणि सोबती समजून घेण्याची. अन्यथा, ही सामाजिक दरी भविष्यात अधिकच रुंदावत जाईल.

### मुलींच्या जन्मदरात घट

गेल्या दहा ते बारा गर्भलिंग निदान, स्त्री भ्रूणहत्या ही प्रवृत्ती वाढल्यामुळे मुलींच्या जन्माचे प्रमाण कमी झाले.मुलांच्या तुलनेत हे प्रमाण व्यस्त असल्याने लग्न जुळत नाहीत.

### मुलींच्या वाढत्या अपेक्षा

सध्या मुलींच्या अवास्तव अपेक्षा वाढत आहेत. मुलींचे उच्चशिक्षित होण्याचे वाढते प्रमाण, चांगल्या पगाराची नोकरी यामुळे लग्न ठरवतानाच मुलाकडे पगार पॅकेज, गाडी, बंगला असले पाहिजे, यावर मुली अडून बसतात. वैवाहिक आयुष्यात कष्ट किंवा एकमेकांच्या सोबतीने संसारिक गोष्टी करण्याची मुलींची तयारी नसल्याने मुलांना सतत नकार दिला जात आहे.

### मुलांचे मानसिक आरोग्य ढासळतेय

नोकरी आहे, घर आहे, दुचाकी आहे, तरीही मुलींच्या वाढत्या अपेक्षांच्या परिघात बसत नाही, यामुळे नकार पचवावा लागणार्या लग्नाळू मुलांचे मानसिक आरोग्य ढासळत आहे. लग्न ठरत नाही, या कारणाने गेल्या चार ते पाच वर्षांत तीस ते पस्तीस वयातील काही मुलांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले आहे.

# दाढ खुर्दमध्ये बिबट्याचा धुमाकूळ

## वनविभागाच्या दिरंगाईमुळे शेतकऱ्यांमध्ये संताप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यात बिबट्याचा वावर दिवसेंदिवस वाढत चालला असून, आता दाढ खुर्द परिसरातील हनुमानवाडी येथे बिबट्याने आपला मोर्चा वळवला आहे. रात्रीच्या सुमारास बिबट्याने शेतकरी अनिल रामभाऊ पाबळे यांच्या वस्तीवर हल्ला चढवत एक शेळी ठार केली.



या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, घटनेला पाच-सहा तास उलटूनही वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी न पोहोचल्याने ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनिल पाबळे हे हनुमानवाडी परिसरात आपल्या कुटुंबासह वास्तव्यास आहेत.

नेहमीप्रमाणे रात्री त्यांनी आपली जनावरे गोठ्यात बांधली होती. मध्यरात्रीच्या सुमारास दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक वस्तीवर हल्ला केला आणि गोठ्यातील शेळीला ठार केले. सकाळी हा प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती मिळताच शेतकरी विकास मंडळाचे नेते नितीन पाबळे आणि किशोर जोशी यांनी तातडीने पाबळे यांच्या वस्तीवर धाव घेतली.

त्यांनी घटनेचा पंचनामा करण्यासाठी आणि पुढील उपाययोजनेसाठी वनविभागाशी वारंवार संपर्क साधला. मात्र, दुर्दैवाची गोष्ट म्हणजे घटना घडून पाच ते सहा तास उलटल्यानंतरही वनविभागाचा एकही कर्मचारी किंवा अधिकारी घटनास्थळी फिरकला नाही. वनविभागाच्या या उदासीन कारभारामुळे शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने वनविभागाने तातडीने येथे पिंजरा लावावा आणि अनिल पाबळे यांना झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी, अशी मागणी नितीन पाबळे व ग्रामस्थांनी केली आहे. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने लक्ष दिले नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.